। धाराशिव । वर्ष २६ वे । अंक १७ वा । गुरूवार दिनांक १९ मार्च, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)–नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत मोईनशाह वय २४ वर्षे, रा. इटकळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि १७.०३.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरामध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ असा एकुण ३८,९१४ किंमतीचा माल विक्री करीता जवळ बाळगलेला नळदुर्ग पो ठाचे पथकास मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम– २२३, २७४, २७५ अधिनियम अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### किचनमधुन सोन्या-चांदीचे व मोबाईलची चोरी

भुम(प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नारायण दत्तोबा नाइकनवरे, वय ३२ वर्षे, रा. शिशंकर नगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे बंद घराचे गेट अज्ञात व्यक्तीने दि. १६.०३.२०२६ रोजी पुर्वी उघडून आत प्रवेश करुन घरातील किचनमधील डब्यातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने मोबाईल फोन असा एकुण ९८,७०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– नारायण नाइकनवरे यांनी दि.१७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४), ३०५ गुन्हा नोंदवला आहे.

### तुळजापूरातून मोटारसायकलची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जय प्रकाश वाळा, वय २७ वर्षे, रा. मलबा हॉस्पीटल बाजूला कमानवेश तुळजापूर धाराशिव ता. जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० एक मोटरसायकल ही दि. १६.०३.२०२६ रोजी मलबा हॉस्पीटल कमानवेश तुळजापूर येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे–जय वाळा यांनी दि.१७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

### ॲल्युमिनियम जर्मन तार व ॲटोची अज्ञाताने केली चोरी

बेंबळी (प्रतिनिधी)– पोलीस ठाणे अंतर्गत दि.१७.०३.२०२६ रोजी बामणी शिवारातील धोंडीबा कोंडाप्पा आरबळके यांचे शेतात शेत गट नं ४६४ मधील ३०० किलो ईलेक्ट्रीक ॲल्युमिनीयम जर्मन तारा व ८ रोलर ॲटो रिक्षा असा एकुण २,२०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे– मनोज अशोक गोडाम, वय ३७ पिजदुरा ता. वरोरा जि. चंद्रपुर यांनी दि.१७.०३.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन बेंबळी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) गुन्हा नोंदवला आहे.

## पवनचक्की चे ॲल्युमिनियम तार चोरणारी टोळी स्थानिक गुन्हे शाखा धाराशिवनी केली अटक : ०३,७५,०००/–किमतीचा मुद्देमाल जप्त

धाराशिव (प्रतिनिधी)– सदरील घटनेची पोलिसाकडून माहिती मिळाली की, दिनांक १७/०३/२०२६ रोजी माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे पेट्रोलिंग करत असताना माहिती मिळाली की, संशयित नामे बालाजी उर्फ आवड्या अजिनाथ शिंदे वय २४ वर्षे व शहाजी भीमराव शिंदे वय ३२ वर्षे दोघे रा मांडवा, जिल्हा धाराशिव यांच्याकडे पवनचक्कीतील ल्युमिनियम तारा चोरीचा मुद्देमाल असून सदर मुद्देमाल त्यांनी लपवून ठेवला आहे, अशी बातमी मिळाल्यावर नमूद व्यक्तींना सिताफिने मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्यांचेकडे, मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी सदरच्या बॲल्युमिनियमच्या तारा तुळजापूर व वाशी तालुक्यातील नळदुर्ग, चिवरी, मानेवाडी, जिन्नर, दहिफळ शिवारातून पवनचक्कीच्या खांबांवरून चोरी केलेल्या असल्याची कबुली दिली. त्यावरून धाराशिव जिल्हा गुन्हे अभिलेख तपासला असता अशा प्रकारच्या चोरीचे ०८ गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले. त्यावरून तात्काळ पंचनामा करून एकूण ७५० किलो वजनाच्या ०३,७५,००० रुपये किमती च्या ॲल्युमिनियमच्या तारा असा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याच्या अन्यसाथीदारांची नावे तसेच चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत माहिती दिली आहे. त्यांनी दिलेल्या माहितीवरून धाराशिव जिल्ह्यातील पवनचक्कीच्या ल्युमिनियम तारा चोरीचे एकूण ०८ गुन्हे उघडकीस आले आहेत. ताब्यात असलेल्या व्यक्तींनी त्यांच्या अन्य साथीदाराच्या मदतीने सदरचे गुन्हे केल्याचे कबुली दिल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी करून रिपोर्ट सह पोलीस ठाणे, वाशी येथे पुढील कारवाई कामी हजर केले आहे .

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, मा.अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. विनोद इज्जपवार, सपोनि सुदर्शन कासार, पोहेका /५७६/ शौकत पठाण, पोहेकॉ /९२९ प्रकाश औताडे, पोहेक/२८९ जावेद काझी, पोहेका /१२७५ फरहान पठाण, मपोह /१३२७शोभा बांगर, पोना /१६३१अशोक ढगारे, पोकॉ/१०२९ योगेश कोळी, चापोह/६६२नागनाथ गुरव, चापोह/५३९ रत्नदीप डोंगरे यांचे पथकाने केली आहे. या बाबत पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## तक्रारदार यांची ऑनलाईन १,५४,०००/– रू ची झालेली फसवणूक; ही सायबर पोलीस स्टेशने परत मिळवून दिले

धाराशिव (प्रतिनिधी)– दिनांक ०५/१२/२०२५ रोजी पूनम दिपक दंडनाईक रा. किणी. ता. जि. धाराशिव यांनी धारशिव आडत येथे सोयाबिन विकली होती, परंतु चुकून त्यांनी ग्राहकाला पैसे पाठवताना चुकीच्या स्कॅनरवरती पेसे पाठवले गेले. त्या स्कॅनरवर वरील अज्ञात नंबरला तक्रारदार यांनी कॉल केला असता त्या अज्ञात व्यक्तीने पैसे पाठवण्यास नकार दिल्याने तक्रारदार यांनी एनसीसीआर पोर्टलच्या हेल्पलाईन नंबर १९३० वरती १,५४,००/– रू.ची फसवणूक झाल्याची तक्रारदार यांनी तक्रार दाखल केली होती. सायबर पोलीस ठाणे येथे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने बँकेला पत्रव्यवहार करून अज्ञात व्यक्तीच्या खात्याची माहिती मागितली. त्या अनुषंगाने बँकेकडून प्राप्त माहितीच्याद्वारे तक्रारदार यांनी तात्काळ केलेल्या तक्रारीमुळे त्या अज्ञात खात्यावरील रक्कम फ्रिझ केली असल्याचे समजले. तसेच आम्ही बँकेला तक्रारदार यांना फ्रिझ झालेली रक्कम परत करण्याबाबत मेल केला असता बँकेने कोर्ट ऑर्डरची मागणी केल्याने संबंधित बँकेला कोर्ट ऑर्डर दिली असता दिनांक १७/०३/२०२६ रोजी तक्रारदार यांचे १,५४,०००/रू त्यांना परत मिळाल्याने तक्रारदार यांनी सायबर पोलीस स्टेशनचे आभार मानले. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, रितु खोखर व मा. अपर पोलीस अधीक्षक, शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोस्टेचे पोनि शकील शेख, पोशि/ ८० गाडे, पोशि/ ६४० सुर्यवंशी. नेमणुक सायबर पोस्टे यांनी पाठपूरावा केला आहे.

सर्व नागरिकांना धाराशिव पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येते की, जर कोणाची ऑनलाईन फसवणूक, हॅकिंग वगैरे झाली असेल तर त्यांनी भारत सरकारच्या ऑनलाईन नॅशनल सायबर क्राइम रिपोर्ट (एन.सी.सी.आर.) पोर्टल वरती किंवा सायबर क्राइमच्या हेल्प लाईन नंबर १९३० कॉल करून तक्रार नोंदवू शकता किंवा सायबर पोलीस ठाणे धाराशिव येथे संपर्क करावा.

## धाराशिव जिल्हा परिषदेत सत्तेचा महासंग्राम! चार महत्त्वाच्या सभापती पदांवर कोणाची 'वर्णी'?



काल्पनिक चित्र

धाराशिव :( रामेश्वर डोंगरे) जिल्हा परिषदेतील सत्तेच्या राजकारणाला सध्या चांगलाच उकळा आला असून येत्या २७ मार्च रोजी होणाऱ्या सभापती निवडीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. इच्छुक उमेदवारांनी अक्षरशः गुडघ्याला बाशिंग बांधून मैदानात उडी घेतली असून, राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

**चार महत्त्वाचे विभाग ठरले 'हॉट सीट'**

जिल्हा परिषदेमध्ये अर्थ व बांधकाम, महिला व बालकल्याण, समाजकल्याण तसेच कृषी व पशुसंवर्धन हे चार सभापती पद अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. त्यामुळे या चार पदांवर नेमकी कोणाची वर्णी लागणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**** सत्ताधाऱ्यांसमोर संतुलनाचा मोठा प्रश्न**

सत्ताधारी गटाकडून सर्व तालुक्यांना आणि गटांना समान प्रतिनिधित्व दिले जाणार का? हा सध्या सर्वात मोठा प्रश्न बनला आहे. प्रत्येक तालुक्यातील सदस्य आपल्या भागाला न्याय मिळावा यासाठी जोरदार लॉबिंग करत आहेत.

**** गुलदस्त्यातच अंतिम समीकरणे**

कोणत्या पक्षाला किती सभापतीपदे मिळणार, कोणत्या विभागावर कोणाचा ताबा राहणार याबाबत अद्यापही सर्व काही गुलदस्त्यात आहे. आतल्या गोटात चर्चा आणि हालचाली सुरू असल्या तरी अधिकृत चित्र २७ मार्चलाच स्पष्ट होणार आहे.

**** धाराशिवमध्ये राजकीय तापमान शिगेला**

जिल्ह्यात सध्या बैठका, चर्चांचा फड आणि गुप्त रणनीती यांचा जोर वाढला आहे. काही ठिकाणी अनपेक्षित समीकरणे जुळण्याची शक्यता असून अंतिम निकालात मोठा ट्विस्ट येण्याची चिन्हे आहेत.

****२७ मार्चला उलगडणार सत्तेचे गणित!**

सभापती पदावर कोण विराजमान होणार, कोणाच्या गळ्यात सत्तेची माळ पडणार आणि कोणाचा खेळ बिघडणार याचा थरार २७ मार्चलाच संपणार आहे.

## अवैध मद्य विरोधी कारवाई: गुन्हे दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)– आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मोनिकाबाई वय २८वर्षे, रा. उपळा रोड धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.१७.०३.२०२६ रोजी उपळा रोड धाराशिव येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम–६५(ई) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत रा. चाफलानगर तांडा ता. दक्षिण सोलापूर ह.मु. फुलवाडी ता. तुळजापूर जि. धाराशिव हे दि.१७.०३.२०२६ रोजी १७.०० वा. सु. फुलवाडी शिवारातील टोलनाक्याजवळ आशमिता हॉटेलच्या शेजारी शिवभाबळीच्या झाडाखाली अंदाजे ६,२०० किंमतीची ६० गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर पमाबाई रा. अक्कलकोट रोड नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव या दि.१७.०३.२०२६ रोजी १६.४५ वा. सु. नळदुर्ग येथे अक्कलकोट रोडवरील पिस्के देशी दारु दुकानाचे बाजूस टपरीच्या आडोशाला अंदाजे ४,०५० किंमतीची ५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम– ६५(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

### जिल्ह्यात गॅस पुरवठा सुरळीत,अफवांवर विश्वास ठेवू नका

धाराशिव दि.१८ मार्च (जिमाका) आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर काही देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तणावपूर्ण वातावरणातही जिल्ह्यात घरगुती गॅस,पेट्रोल,डिझेल व गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत सुरू राहावा यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.तथापि,काही नागरिक गॅस एजन्सीच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करत असल्याचे निदर्शनास येत आहे.

दिनांक १७ मार्च २०२६ रोजी जिल्ह्यातील गॅस एजन्सीकडील वितरणाचा आढावा घेतला असता, गॅस एजन्सीकडून घरपोच करण्यात आलेले वितरण ४६०५ सिलेंडरचे होते,तर एजन्सीमधून प्रत्यक्ष केलेले वितरण केवळ १२१९ सिलेंडर एवढे होते.तसेच शिल्लक गॅस सिलेंडरचा साठा ४२५२ इतका उपलब्ध असल्याचे आढळून आले.

जिल्ह्यातील घरगुती गॅस सिलेंडर वितरण तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**आगांधी शिल्लक – ५४२८,आवक – ४६४८,एकूण साठा – १००७६**

**घरपोच वितरण – ४६०५, एजन्सीमधून केलेले वितरण – १२१९.एकूण वितरण – ५८२४, शिल्लक साठा – ४२५२ एवढा आहे.**

सर्व गॅस एजन्सीधारकांकडे गॅसचा पुरेसा साठा असून नियमित आवक व वितरण सुरळीत सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता आपली गॅस जोडणी असलेल्या कंपनीच्या अधिकृत क्रमांकावर संपर्क साधावा किंवा व्हॉट्सॲप/ प्ले स्टोअरवरील अधिकृत ॲप्लिकेशनद्वारे ऑनलाइन बुकिंग करून घरपोच गॅस सेवेचा लाभ घ्यावा.तसेच गॅस एजन्सीच्या ठिकाणी अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## महिलांचे खंबीर नेतृत्व ठरले प्रेरणास्थान



धाराशिव (प्रतिनिधी) : – गावागावात महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या सौ. अर्चनाताई पाटील यांची धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड झाल्याने सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाला नवे बळ मिळणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर सौ. शशिकल पाटील, सौ. अनिता तोडकर व सौ. किरण निंबाळकर यांनी अर्चनाताई पाटील यांचे अभिनंदन करत त्यांच्या नेतृत्वामुळे महिला बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांना स्वावलंबी होण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. तसेच ग्रामीण भागातील महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी नमूद केले.

अर्चनाताई पाटील यांच्या पुढील कार्यकाळात महिला सक्षमीकरण, ग्रामीण विकास व विविध सामाजिक उपक्रमांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वातून जिल्ह्यातील महिलांसाठी नव्या संधी उपलब्ध होतील, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी, कृषिमंत्र्यांकडे आमदारांची मागणी



धाराशिव/मुंबई (प्रतिनिधी)– विधानभवन येथे धाराशिवचे आमदार कैलास पाटील व उमरगा–लोहारा तालुक्याचे आमदार प्रविण स्वामी यांनी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन दि. १७ मार्च २०२६ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीटीमुळे झालेल्या शेती नुकसानाबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६ रोजी धाराशिव–उमरगा–लोहारा मतदारसंघात दुपारच्या सुमारास अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपीट झाली. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. द्राक्ष, केळी, आंबा तसेच विविध फळबागांसह कांदा, हरभरा, गहू, ज्वारी यांसारख्या पिकांचे हजारो हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. विशेषतः गारपीटीमुळे अनेक ठिकाणी उभी पिके जमिनीवर आडवी पडली असून, हातातोंडाशी आलेले पीक पूर्णतः नष्ट झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, त्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करण्याचे आदेश देऊन शेतकऱ्यांना विलंब न करता नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदारांनी कृषीमंत्र्यांकडे केली आहे. शासनाने या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, मंगळवारी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये अवकाळी पाऊस पडला. सोलापूरच्या अक्कलकोट येथे तसेच सांगलीच्या मिरजच्या काही भागात गारपीटही झाली. लातूर, धाराशिव, नांदेड, सोलापूर, सांगली तसेच साताराच्या काही भागांमध्ये जोरदार पाऊस पडला. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे चांगलेच नुकसान झाले आहे. आजही धाराशिवच्या उमरगा–लोहारा तालुक्यातील काही भागांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# गारांचा पावुस नसावा

पावुस अत्यावश्यक आहे. पावसाशिवाय पाणी मिळत नाही. जगात कितीही संशोधन झाले, जग कितीही पुढे गेले तरी ज्या बाबी निसर्गनिर्मित आहेत, त्या दुसऱ्याला बनविता आल्या नाहीत किंवा येत नाहीत हे सत्यच आहे. पाणी, हवा, सुर्य आदि निसर्गनिर्मित आहेत याला तोड नाही. त्या ईश्वरनिर्मित आहे. ईश्वरनिर्मितीच्यापुढे कोणालाही जात येत नाही. हे सत्य आहे. एक धान पेरल्यातर कणसाद्वारे शेकडो दाणे मिळतात. आंब्याचे झाडाची महती जाणून घेतल्यास पहिल्यांदा कैरी लागते ती आंबट लागते, कालांतराने त्यात गोडी भरल्यास गोड लागते. एका झाडाला शेकडो फळे लागतात. केवळ एक झाड एक बी बस्स असते. निसर्ग ज्यांनी जाणून घेतला त्यांनी जगण्याची कला समजून आली. मुळात निसर्गावर प्रेम करीत नाहीत तर बऱ्याच वेळा ऱ्हास केला जातो. हे योग्य नाही. आपल्या भारतात तीन ऋतू आहेत. तेही चार-चार महिण्याचे आहेत. पावसाळा, उन्हाळा आणि हिवाळा! पावसाळ्यात पावुस पडतो. त्यामुळे शेतकरी अन्नधान्य पेरतो. हिवाळ्यात विविध फळे, हिवाळी पिके घेतले जातात. तर उन्हाळ्या या आठ महिण्यात जमीनीतून अन्नधान्य पिकविल्या जमीनीची मशागत केली जाते. हे ईश्वरीय चक्र आहे. मानवाने निसर्गाची साथ सोडली. अतिरेक सुरू केला. क्षमतेपेक्षा अधिक धान्य पिकविण्याच्या नादात भूमातेच्या पोटात विषारी औषधे कोंबण्याचा प्रयत्न होत आहे, औषधे फवारणी करू लागले. त्यामुळे भूमाताबरोबर निसर्गही कोपला जावू लागला. निसर्गाचे संतुलन बिघडले तर अवेळी गारांचा पावुस, जोरदार वृष्टी होते, त्यामुळे नुकसान होते. निसर्ग जीवसृष्टीला त्रास देत नाही. जीवसृष्टीला हानी पोंहचवित नाही. मानवाच्या चुकीच्या वागण्याचा परिणाम भोगावा लागतो आहे. या देशात पुर्वी अवेळी पावुस पडला नाही किंवा पूर आला नाही. आलिकडे ही परिस्थिती का निर्माण होत आहे. याचा विचार केला जात नाही. निसर्ग हा देणारा आहे हे पहिल्यांदा लक्षात ठेवले पाहिजे. नुकसान करणारा गारांचा पावुस झाला यामुळे द्राक्षा, फळबागा, हरभरा, आंब्याचे नुकसान झाले. पावुस झाला तरी ठिक मात्र गारांचा पावुस हा मोठे नुकसान करतो. जमीन नापीक करतो. जमीनीची गुणवत्ता कमी करतो. अचानक कोसळलेल्या गारांच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी बिचार नुकसान सहन करतो आहे. आज पर्यंत करीत आला आहे. एकतर आलिकडे निसर्ग साथ देत नाही. त्यात असे अचानक उद्भवणारे संकटामुळे शेतकरी पुर्ण आर्थिकदृष्टया कोलमोडला आहे. वरचेवर नवनवीन संकटे येत आहेत. आता गरज नसताना गाराचा पावुस सर्वत्र झाला आहे. यावर कशा प्रकारे मात करायाची याची चिंता सतावणार आहे. त्यामुळे निसर्गाची छेडछाड करू नको. वृक्षतोड करू नका. डोंगरे नष्ट करू नका. आज पक्षी दिसून येत नाहीत. थवेच्याथवे पक्षी आकाशात दिसत होते. मनमोहक चित्र केवळ चित्रातून दिसून येत आहे. ही परिस्थिती बदलली पाहिजे. नैसर्गिक संकट मानव निर्माण करीत आहे. त्यामुळे अचानक कोसळलेल्या गारांच्या पावसाचे नुकसान मोठे आहे. एकतर पावुसाचे वातावरण होते पण गाराचा पावुस पडला आहे. जमीन थंडगार होणार आहे. उन्हाळ्यात जमीन चांगली तापली तरच पिके चांगली येतात. ईश्वराने सुर्यात अग्नीचे स्वरूप दिले आहे. चंद्रात शितलता दिली आहे. त्यामुळे उन्हाळ्यात उन्ह पडले पाहिजे. जमीन चांगली तापली पाहिजे. जमीन चांगली तापालीतरच मोठ्या प्रमाणता शेतीत उत्पादन होते. शेतकरी उन्हाळ्यात जमीन नांगरतो म्हणजे जमीनतील माती खालचीवर केली जाते. त्याच प्रमाणे गच्च झालेली माती मोकळी केली जाते. उन्हामुळे जमीन तापली व मृग नक्षत्राचा पावुस पडला तर जमीनीचा सुगंध येतो. त्यामुळे कोणत्याही परिस्थिती ऋतूचक्र बदलता कामा नये. सध्यालां ऋतूमान बदलल्याचे दिसून येत आहे. गतवर्षी भर उन्हाळ्या मोठा पावुस झाला व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. शेतीचे मात्र नुकसान झाले. मृगनक्षत्रावर पडणारा पावुस लांबला. पेरण्या लांगल्या. निसर्ग हा जीवसृष्टिला साथ देणारा आहे. पुर्वी ऋतूचक्र व्यवस्थित होते. वातावरणातील दूषीतपना नव्हता. वातावरण शुद्ध होते. हवा शुद्ध होती. वातावरणारत बिघाड निर्माण केला आहे. वाढती कारखानदारीतून निघणार विषारी धुर, दोन-चार चाकी गाड्यात वाढ, यामुळे दूषीत वातावरण निर्माण होत आहे. दूषीत वातावरणावर मात एक तर मोठ्या प्रमाणात झाडे लावली पाहिजेत. दुसरी बाब यज्ञ केला पाहिजे. आपले ऋषीमुनी, राजे-महाराजे हे मोठ-मोठी यज्ञ करीत असत. तेही अनेक दिवस यज्ञ चालत असत. यामागील कारण म्हणजे वातावरण शुद्ध करणे हा हेतू होता. एक झाड लावले तर किमान पाचवर्ष मोठी व्हायला लागतात मात्र यज्ञामुळे त्वरीत वातावरणाची शुद्धी होते हे विज्ञानाने सिद्ध केले आहे. वास्तविक नवीन काही नाही. आपल्या पुर्वजांनी जे सांगितले आहे जे करीत आले आहेत त्याचा विसर पडला आहे. हे योग्य नाही. विचारी मंडळी नाही. गारा का पडतात. उन्हाळ्यात पावुस का पडतो आहे. यावर चिंतन होत नाही. नुकसान झाले मागा सरकारला नुकसान भरपाई. करा आंदोलन, सरकार देते मात्र दुसऱ्या रुपाने करात वाढ करते. आपल्याकडून घेते व आपल्याला देते. हे चक्र लक्षात येत नाही. मुळात भारतीयांचे नशीब मोठे आहे. येथे तीन ऋतूमान आहेत. इतर देशात तसे नाही. पावुस, आंधरमय जीवन, उन्हाचा पत्ताच नसतो. भारतात तसे नाही. निसर्गाची मोठी देन आहे. जो कोणताही कर, पैसा घेत नाही. मोफत देतो त्याचे तरी नुकसान करू नका. ऱ्हास करू नका. त्याची जोपासना करा. ते न केल्याने असे गारांचा पावुस अवेळी पडतो आहे. यात मोठे नुकसान होत आहे. निसर्ग चमत्कारीत आहे. अर्धातासात पाणीच पाणी करतो. एवढे कशाला दहा मिनीटात पाणीच पाणी करून नदी-नाले भरून वाहाताना दिसून येते. एवढी क्षमता निसर्गात आहे. निसर्गाची जोपासना केली तरच तो आपल्याला नुकसान पोंहचविणार नाही. साथ देईल, सुख-समृद्धी देईल. याचा विचार करावा. गारांचा पावुस हे एक संकट आहे. तेही शेतकऱ्यावर आहे. हे लक्षात घेता यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. पावुस पडलाच पाहिजे तोही वेळवर यासाठी निसर्गाशी नाते जोडावे. ऱ्हास करू नये. नसता असे संकटाला समोरे जावे लागेल.

# एमआयटी लातूर येथे 'विश्वमैदान २०२६' आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन

## विविध खेळांनी रंगणार विश्वमैदान क्रीडा महोत्सव; प्रा. तेजस कराड यांची माहिती


प्रा. तेजस कराड

**लातूर/प्रतिनिधी :** युवकांमध्ये क्रीडावृत्ती, नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित करण्याच्या उद्देशाने माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या पुढाकारातून दि. २२ मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत "विश्वमैदान २०२६" या भव्य आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या क्रीडा महोत्सवामागे माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांची प्रेरणादायी संकल्पना असून एमआयटी शिक्षण संस्था समूह, लातूरचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

"एकच आव्हान, जिंकूया मैदान!" या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या क्रीडा स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांतील उत्कृष्ट खेळाडूंना एकत्र येऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. विश्वमैदान २०२६ हा केवळ क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम नसून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धात्मक वातावरणातही खेळाडूवृत्ती, शिस्त आणि बंधुभाव जपण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.

या क्रीडा स्पर्धेत बाह्य (आउटडोअर), अंतर्गत (इनडोअर) आणि ॲथलेटिक्स अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. आउटडोअर प्रकारांमध्ये व्हॉलीबॉल (मुले), थ्रोबॉल (मुली), फुटबॉल (मुले), क्रिकेट (मुले व मुली), खो-खो तसेच कबड्डी या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. इनडोअर खेळांमध्ये टेबल टेनिस, कॅरम, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन या स्पर्धांचा समावेश आहे. तर ॲथलेटिक्स प्रकारात १०० मीटर व २०० मीटर धावणे, ४१०० मीटर रिले, डिस्कस थ्रो, जेव्हलिन थ्रो, शॉटपुट आणि लाँग जंप या स्पर्धा होणार आहेत.

या स्पर्धेची सुरुवात दि. २२ मार्च २०२६ रोजी होणार आहे. दि. २२ मार्च ते २९ मार्च या कालावधीत लीग आणि नॉकआउट सामने खेळवले जाणार आहेत. दि. ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता उद्घाटन समारंभ पार पडणार आहे. त्यानंतर दि. ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत उपांत्य आणि अंतिम सामने खेळवले जातील. स्पर्धेचा समारोप समारंभ दि. ३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

या स्पर्धेत विविध वैद्यकीय महाविद्यालयांमधील ६८५ पेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. प्रत्येक महाविद्यालयातून केवळ सर्वोत्तम संघ किंवा सर्वोत्तम खेळाडूला प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली जाणार आहे. स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या संस्थेला जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे.

आजच्या डिजिटल युगात युवकांना प्रत्यक्ष क्रीडांगणाशी जोडण्याचा आणि त्यांच्यात सकारात्मक स्पर्धेची भावना निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. "वसुधैव कुटुंबकम्" या तत्त्वावर आधारित बंधुभाव आणि जागतिक शांततेचा संदेशही या क्रीडा महोत्सवातून दिला जाणार आहे. त्यामुळे 'विश्वमैदान २०२६' हा क्रीडा स्पर्धांसोबतच युवकांच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण सोहळा ठरणार असल्याची माहिती माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस हनुमंत कराड यांनी दिली.

# लातूर जिपच्या अध्यक्षा उषाताई पाटील यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून अभिनंदन



**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. उषाताई संभाजी पाटील तळेगावकर यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड आणि अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांनी आगामी पाच वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी आणि सर्वांगीण विकासाची गंगा घराघरांत पोहोचवण्यासाठी अनमोल सूचना केल्या.

मुंबई येथील या सदिच्छा भेटीप्रसंगी पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले, भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड, अरविंद पाटील निलंगेकर, जिपचे गटनेते रामचंद्र तिरुके, संभाजी पाटील तळेगावकर, नगरसेवक शहाजी पाटील तळेगावकर, भरत चामले आणि कु. भक्ती तळेगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# मानसिक आरोग्याकडे सर्वांगीण दृष्टीकोन

मानसिक आरोग्याबाबत आज समाजात जागरूकता वाढत असली तरी केवळ आजारावर उपचार करण्यापेक्षा मानसिक स्वास्थ्य जपणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. यासाठी समग्र (Holistic) दृष्टीकोन अत्यंत उपयुक्त मानला जातो. या दृष्टीकोनानुसार व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे फक्त मनाशी संबंधित नसून शरीर, भावना, सामाजिक संबंध आणि जीवनशैली या सर्व घटकांवर अवलंबून असते. प्रथम, शारीरिक स्वास्थ्य हे मानसिक स्वास्थ्याचे आधारस्तंभ आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि व्यसनांपासून दूर राहणे यामुळे मन ताजेतवाने राहते. शरीर निरोगी असेल तर तणाव सहन करण्याची क्षमता वाढते. दुसरे म्हणजे भावनिक व मानसिक संतुलन. सकारात्मक विचार, ध्यान-धारणा, तणाव व्यवस्थापन आणि आपल्या भावना व्यक्त करण्याची सवय या गोष्टी मन स्थिर ठेवतात. आवश्यकतेनुसार समुपदेशन (counselling) घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तिसरे, सामाजिक नातेसंबंध. कुटुंब, मित्र आणि समाजाशी असलेले सुदृढ संबंध व्यक्तीला भावनिक आधार देतात. एकटेपणा आणि तुटलेपण टाळण्यासाठी संवाद आणि सहकार्य आवश्यक आहे. चौथे, आध्यात्मिक व जीवनमूल्ये. ध्यान, योग, निसर्गसंग, कृतज्ञता आणि जीवनातील उद्दिष्टांची जाणीव यामुळे अंतः शांती मिळते आणि जीवनाला दिशा मिळते. समग्र दृष्टीकोनाचा मुख्य हेतू म्हणजे केवळ आजार टाळणे नव्हे, तर संतुलित, आनंदी आणि अर्थपूर्ण जीवन जगणे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात या सर्व घटकांचा समावेश केल्यास मानसिक स्वास्थ्य अधिक बळकट होऊ शकते. आजच्या धकाधकीच्या जीवनात हा दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

**लेखक – ॲड माने यश संतोष**

# मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७: अंमलबजावणीतील आव्हाने आणि सद्यस्थिती

मानवी जीवनात मानसिक आरोग्य हे शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे आहे. बदलती जीवनशैली, ताणतणाव आणि सामाजिक दबावामुळे नैराश्य आणि चिंता यांसारख्या समस्या वाढत आहेत. भारतात पूर्वीचा 'मानसिक आरोग्य कायदा, १९८७' हा रुग्णांच्या हक्कांपेक्षा त्यांच्या संस्थात्मक देखभालीवर अधिक भर देत असे. ही उणीव भरून काढण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानकांनुसार, भारत सरकारने 'मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७' लागू केला.कायद्याची प्रमुख उद्दिष्टेमानसिक आजार असलेल्या व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणे.भेदभावमुक्त, स्वस्त आणि दर्जेदार उपचार उपलब्ध करून देणे.मानसिक आरोग्याशी निगडित सामाजिक कलंक (Stigma) दूर करणे.कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी

**१. उपचारांचा अधिकार:** सरकारी निधीतून चालणाऱ्या सेवांद्वारे उपचार मिळवणे हा प्रत्येक व्यक्तीचा हक्क आहे.

**२. समुदाय वास्तव्याचा अधिकार:** रुग्णांना समाजात राहण्याचा आणि सहभागी होण्याचा अधिकार आहे, त्यांना विनाकारण मानसिक आरोग्य केंद्रात डांबून ठेवता येणार नाही.

**३. ॲडव्हान्स डायरेटिव्ह :** भविष्यात मानसिक आजार झाल्यास आपल्यावर कशा प्रकारे उपचार व्हावेत, हे ठरवण्याचा अधिकार व्यक्तीला देण्यात आला आहे.

**४. गोपनीयता आणि समानता:** रुग्णाच्या आजाराची माहिती गुप्त राखणे आणि नोकरी, शिक्षण किंवा गृहनिर्माण क्षेत्रात त्याच्याशी भेदभाव न करणे बंधनकारक आहे.

अंमलबजावणीतील प्रमुख आव्हानेहा कायदा प्रगत असला तरी, त्याच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत:व्यावसायिकांची कमतरता: भारतात मानसोपचारतज्ज्ञ आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची मोठी कमतरता आहे.पायाभूत सुविधांचा अभाव: ग्रामीण भागात मानसिक आरोग्य केंद्रांची अत्यंत कमतरता आहे. सामाजिक कलंक: आजही समाजात मानसिक आजाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन नकारात्मक असल्याने लोक उपचार घेण्यास कचरतात.निधीची कमतरता: इतर आरोग्य क्षेत्रांच्या तुलनेत मानसिक आरोग्यासाठी मिळणारा सरकारी निधी अपुरा आहे.निष्कर्ष आणि उपाययोजनामानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७ हा एक ऐतिहासिक टप्पा आहे, परंतु त्याचे यश हे केवळ कागदावर मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर अवलंबून आहे. सरकारने ग्रामीण भागात पायाभूत सुविधा वाढवणे, जास्तीत जास्त तज्ज्ञांची नेमणूक करणे आणि जनजागृती मोहिमा राबवणे आवश्यक आहे. जेव्हा समाज आणि सरकार एकत्रित प्रयत्न करतील, तेव्हाच मानसिक आजार असलेल्या व्यक्तींना सन्मानाने जगता येईल.

या विषयाशी संबंधित महत्त्वाचे न्यायालयीन निकाल: नवतोज सिंग जोहर विरुद्ध केंद्र सरकार (२०१८) अरुणा रामचंद्र शानबाग विरुद्ध केंद्र सरकार (२०११)

**लेखक: कदम सुशांत विलास**
**(LL.M. प्रथम वर्ष)**
**मार्गदर्शक: सहाय्यक प्राध्यापिका**
**स्वाती पाटील मॅडम**

# आधुनिक गुढीपाडवा : घरातील गुढीपूजेची नवी परंपरा



आजच्या शहरी आणि बदलत्या जीवनशैलीत गुढी पाडवा साजरा करण्याच्या पद्धतीत लक्षणीय बदल दिसून येतो. पूर्वी घराबाहेर उंच गुढी उभारण्याची परंपरा सर्वत्र प्रचलित होती; परंतु आज अनेक कुटुंबे घराच्या आत, टेबलावर किंवा पूजाघरात गुढी ठेवून पूजा करण्याची पद्धत स्वीकारताना दिसतात. शहरांमध्ये फ्लॅट संस्कृती वाढली असून उघडी जागा कमी झाल्यामुळे, तसेच सुरक्षिततेच्या आणि सोयीच्या कारणांमुळे हा बदल घडताना दिसतो. या आधुनिक पद्धतीत गुढीची पारंपरिक रचना मात्र कायम ठेवली जाते. लहान आकारातील काठी, रेशमी कापड, कडुनिंब व आंब्याची पाने, साखरेच्या गाठी आणि छोटा कलश यांच्या साहाय्याने गुढी तयार केली जाते आणि ती टेबलावर किंवा देवघरात स्थिरपणे सजवली जाते. यामुळे घरातच पवित्र, प्रसन्न आणि मंगल वातावरण निर्माण होते. गुढी बाहेर उभारली नाही तरी तिच्यामागील आध्यात्मिक अर्थ अजिबात कमी होत नाही. श्रीराम यांच्या विजयाची आठवण आणि ब्रह्मदेव यांच्या सृष्टीनिर्मितीचा संदेश या पूजेमध्ये तितक्याच श्रद्धेने जपला जातो. गुढी ही विजय, समृद्धी, नवसुरुवात आणि सकारात्मकतेचे प्रतीक म्हणून आजही तेवढ्याच भावनेने पूजली जाते. आधुनिक गुढीपाडवा साजरा करताना घरात रांगोळी काढणे, फुलांची सजावट करणे, दिवा लावणे आणि कुटुंबासह पूजा करणे याला विशेष महत्त्व दिले जाते. काही कुटुंबे पर्यावरणपूरक पद्धती अवलंबतात, तर काहीजण साधेपणाने सण साजरा करतात. डिजिटल माध्यमातून शुभेच्छा देणे, पारंपरिक पोशाख परिधान करणे आणि घरातच उत्सव साजरा करणे या गोष्टींमुळे सणाची आनंदमयता अधिक वाढते. या बदलत्या परंपरेतून एक महत्त्वाचा संदेश स्पष्ट होतोपरिस्थितीनुसार सण साजरा करण्याच्या पद्धती बदलल्या तरी त्यामागील श्रद्धा, संस्कृती आणि सकारात्मकता कायम राहते. म्हणूनच गुढी बाहेर उभारली किंवा घरात पूजली, यापेक्षा तिच्यामागील भावना अधिक महत्त्वाची आहे. **–डॉ. सुवर्णा कराड, पुणे.**

# 'हे' पदार्थ चोरपावलांनी वाढवताहेत जीवघेण्या कॅन्सरचा धोका

कॅन्सर हा एक अतिशय धोकादायक आजार आहे. जर तो लवकर ओळखला गेला नाही तर तो मृत्यूलाही कारणीभूत ठरू शकतो. कॅन्सरची अनेक कारणे असू शकतात, ज्यात खाण्याच्या चुकीच्या सवयींचा देखील समावेश आहे. अनेकांना वाटते की, केवळ धूम्रपान किंवा मद्यपान केल्याने कॅन्सर होतो, परंतु हे खरं नाही. अन्न शिजवणे, गरम करणे आणि साठवणे देखील कॅन्सरमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. जरी हे बदल लगेच दिसून येत नसले तरी, ते हळूहळू पेशींवर परिणाम करतात.

कर्करोगाला चालना देणारे पदार्थ

तेल पुन्हा गरम करणे: भारतीय स्वयंपाकघरांमध्ये स्वयंपाकाच्या तेलाचा पुनर्वापर करणे सामान्य आहे. लोक तेल वाया जाऊ नये म्हणून असे करतात. परंतु, जेव्हा तेल बॉइलिंग पॉइंटच्या खाली थंड होते, तेव्हा त्याची मॉलिक्यूलर स्ट्रक्चर बदलते. ऍँ च्या अभ्यासानुसार, ते पुन्हा गरम केल्याने अल्डीहाइड्ससारखे विषारी पदार्थ तयार होतात. यामुळे शरीरात जळजळ होते, डीएनए खराब होते आणि कॅन्सर होतो. जळलेले किंवा जास्त फ्राय केलेलं अन्न: कबाब, चपाती किंवा ब्रेड जळल्यास ते चविष्ट लागू शकतात. परंतु ते अन्न धोकादायक देखील असू शकते. कारण जाळलेल्या अन्नामध्ये हेटेरोसायक्लिक अमाइन आणि सारखी रसायने तयार होतात. इंटरनॅशनल एजन्सी फॉर रिसर्च ऑन कॅन्सरने इशारा दिला आहे की, हे कोलन आणि स्वादुपिंडाच्या कर्करोगाशी जोडलेले आहेत. प्रक्रिया केलेल्या मांसाचे दररोज सेवन: सॉसेज, बेकन, हॅम आणि सलामी सारख्या प्रक्रिया केलेल्या मांसामध्ये चव वाढविण्यासाठी नायट्रेट्स जोडले जातात, जे एकदा सेवन केल्यानंतर कर्करोग निर्माण करणाऱ्या रसायनांमध्ये बदलतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते , दररोज ५० ग्रॅम प्रक्रिया केलेले मांस देखील खाल्ल्याने कोलन कॅन्सरचा धोका लक्षणीयरीत्या वाढतो. खूप गरम पेये पिणे एका अभ्यासानुसार, दररोज खूप गरम तापमानात (६५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त) चहा आणि कॉफी पिणे धोकादायक आहे. या उच्च तापमानाच्या वारंवार संपर्कात राहिल्याने अन्ननलिकेच्या आतील टिशूजचे नुकसान होते. जेव्हा हे घाव बरे होत नाहीत आणि वारंवार उष्णतेच्या संपर्कात येतात तेव्हा ते कॅन्सरच्या पेशींमध्ये विकसित होण्याची शक्यता जास्त असते.

**पॅकेज केलेले निरोगी अन्न:** प्रोटीन बार, फ्लेवर्ड ओट्स, ब्रेकफास्ट सीरियल्स आणि डाएट बिस्किटे हे आरोग्यदायी असतात, परंतु त्यात जोडलेले फ्लेवर्स, कृत्रिम गोड पदार्थ आणि रंग शरीरात सतत जळजळ निर्माण करतात. यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो.

कमी फायबरचे सेवन: वजन कमी करण्यासाठी कमी फायबर खाणे ही एक वाईट सवय आहे. कमी फायबरयुक्त आहारामुळे कॅन्सरचा धोका वाढतो. आतड्यांमधून विषारी पदार्थ काढून टाकण्यासाठी आणि फायदेशीर बॅक्टेरियाच्या वाढीस चालना देण्यासाठी फायबर आवश्यक आहे. जे लोक दररोज २० ग्रॅमपेक्षा कमी फायबरचे सेवन करतात त्यांना कोलन कॅन्सरचा धोका जास्त असतो. प्लास्टिकच्या डब्यात अन्न गरम करणे: प्लास्टिकच्या डब्यात अन्न मायक्रोवेव्हमध्ये ठेवणे किंवा प्लास्टिकच्या झाकणांमध्ये पॅक केलेले गरम अन्न खरेदी करणे प्लास्टिकमधून विषारी पदार्थ अन्नात सोडू शकते. यामुळे हार्मोनल संतुलन बिघडू शकते आणि नुकसान होऊ शकते.

सकाळी रिकाम्या पोटी डाळिंबाचा रस पिण्याचे आहेत जबरदस्त फायदे, अनेक समस्यांवर रामबाण उपाय

फळे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात आणि म्हणूनच त्यांना आरोग्या खजिना म्हटले जाते. कारण कोणत्याही फळात फायबर, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असतात. फळांचे सेवन केल्याने शरीरातील पोषक घटकांची कमतरता दूर होण्यास मदत होते. म्हणूनच तज्ज्ञ फळे किंवा त्यांचे रस पिण्याचे सल्ले देतात. डाळिंब हे एक असे फळ आहे, ज्याचा रस खूप फायदेशीर ठरू शकतो. डाळिंबाचा रस त्याच्या समृद्ध पोषक तत्वांसाठी, अँटीऑक्सिडंट्ससाठी आणि अनेक आरोग्य फायद्यांसाठी ओळखला जातो.

# गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान आणि नवसंस्कृतीचा भारतीय उत्सव

प्रविण बागडे,नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९



भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड़वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे.

भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता.

गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साख-रेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा.

गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते. झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळ-तो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुव-ातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे. गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा, आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आह-ोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो,

जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा.

आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

## अल्झायमरसह या आजारांसाठी ध्यान सर्वात प्रभावी माध्यम

**(क्रमशः कालच्या अंकावरुन)**....२. हृदयरोगात ध्यानाची भूमिका दुसरा सर्वात सामान्य आणि धोकादायक आजार म्हणजे हृदयरोग. उच्च रक्तदाब, कोलेस्टेरॉल आणि ताण ही हृदयरोगाची तीन मुख्य कारणे आहेत. ध्यान केल्याने केवळ तणाव संप्रेरक कॉर्टिसोलची पातळी कमी होत नाही तर हृदयाचे ठोके सामान्य होतात आणि रक्तदाब नियंत्रित होतो. हृदयरोग्यांसाठी वीस मिनिटांचे मार्गदर्शनित श्वासोच्छवासाचे ध्यान चमत्कारिक ठरू शकते.


३. कर्करोगाच्या रुग्णांसाठी मानसिक बळ
कर्करोगाचा उपचार हा शारीरिक उपचारांइतकाच मानसिक असतो. केमोथेरपी आणि औषधे अनेकदा कर्करोगाच्या रुग्णांना नैराश्य आणि चिंता यांचा सामना करावा लागतो. ध्यान केल्याने केवळ मानसिक शांती मिळत नाही तर शरी-राची प्रतिकारशक्ती देखील मजबूत होते. माइंडफुलनेस ध्यान कर्करोगाच्या रुग्णांमध्ये मूड, झोप आणि भावनिक लवचिकता सुधारू शकते.

मानसिक शांतीसाठी हे ३ योगासन करा

४. दमा आणि श्वसनाच्या आजारांपासून आराम
दमा आणि इतर श्वसन आजारांमुळे वारंवार श्वास लागणे, चिंता आणि पॅनिक अटॅक येऊ शकतात. प्राणायाम आणि बॉडी स्कॅन ध्यान तंत्रांमुळे ऑक्सिजन परिसंचरण सुधारू शकते आणि श्वसनाच्या समस्या दूर होऊ शकतात. हे विशेषतः अशा लोकांसाठी उपयुक्त आहे जे इनहेलरशिवाय राहू शकत नाहीत.


५. जुनाट वेदना आणि मायग्रेनसाठी ध्यानाची शक्ती
सततच्या डोकेदुखी, पाठदुखी किंवा स्नायू दुखण्यासारख्या दीर्घकालीन वेदनांपासून औषधे तात्पुरती आराम देतात, परंतु ध्यान या समस्यांच्या मुळाशी पोहोचते. शरीर जागरूकता आणि प्रेमळ-दया ध्यान सारख्या तंत्रांमुळे शरी-रातील एंडोर्फिनचे उत्सर्जन वाढते, जे नैसर्गिक वेदनाशामक म्हणून काम करतात.

६. मानसिक आरोग्य सुधारते -आजकाल, विशेषतः तरुणांमध्ये, नैराश्य आणि चिंता ही सर्वात गंभीर मानसिक समस्या बनली आहे. सोशल मीडिया, शैक्षणिक दबाव आणि करिअरचा ताण हे सर्व मनाला सतत सक्रिय ठेवतात. ध्यान, विशेषतः माइंडफुलनेस मेडिटेशन, मेंदूला आराम देते आणि सेरोटोनिन सारखे फील-गुड हार्मोन्स सक्रिय करते. हे तंत्र अतिविचार टाळण्यास मदत करते आणि तरुणांना आतून सक्षम बनवते.



अस्वीकरण: आरोग्य, सौंदर्य काळजी, आयुर्वेद, योग, धर्म, ज्योतिष, वास्तु, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर वेबदुनियावर प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत, सार्वजनिक हित लक्षात घेऊन. वेबदुनिया या बाबींची सत्यता पुष्टी करत नाही. कोणताही वापरण्यापूर्वी नेहमीच तज्ञांचा सल्ला घ्या.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



दररोज केळं खाउन त्यावर दूध पिण्याने समस्या दूर होईल.कांदा खाणे नेहमीच फायदेशीर ठरेल. कच्चा कांदा खाणे अधिकच चांगले परिणाम देईल.फास्ट फूड, अधिक प्रमाणात डेअरी प्रॉडक्ट्स, हेवी फूड्स सेवन केल्याने वाईट परिणाम दिसून येतात. असे खाद्य पदार्थ सेवन करणे टाळावे. पुनर्नवा अर्थात घेटुळी या वनस्पतीच्या मुळाचे दोन चमचे ताजे रस दुधासोबत दोन ते तीन महिन्यापर्यंत सेवन केल्याने वृद्ध व्यक्तीला देखील तारुण्य जाणवू लागतं.तिळाचे तेल आणि दुधी भोपळ्याचा रस सम प्रमाणात घ्यावा. **(क्रमशः उद्याच्या**

## २ Joke विनोद




माझ्या घरात मी बॉस आहे असे म्हणणारा पुरुष दुसऱ्या बाबतीतही खोटे बोलू शकेल हे लक्षात ठेवा.

## ३ Message संदेश




Air hostess to Lalu Yadav:
Sir, R U Vage or Nonvage??
Lalu : Ka matlab:
Air hostess :
Sir Mera matlab hai,
Aap Shakahari hen Ya Masa-hari??
Lalu : Huttt sasuri..
I am Bihari..

## ४ Thought सुविचार



सर्वात जास्त आनंद कोणत्या गोष्टीत असेल तर दुसऱ्यांना आनंद देण्यात.

**- कवि वर्डस्वर्थ**


**सुभाषित**

**अभ्यावहति कल्याणं विविधं वाक्**
**सैव दुर्भाषिता राजन्ननर्थायोपद्यते ।।**

(उद्योगपर्व, अध्याय ३४, श्लोक ७७ महाभारत)

अर्थ - वाणीने चांगले भाषण केले असता त्यापासून अनेक प्रकारे कल्याण होते परंतु दुर्भाषण केले असता तीच वाणी अनर्थाला कारण होते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. गुन्हा
५. करमणूक करणारे
८. सडपातळ
११. खर्चापेक्षा ही अधिक असलेली बरी!
१२. गुजराथी नृत्य प्रकार
१४. वर्तुळ
१६. भरभराट
१९. मुरली, बासरी
२०. धोबी
२१. सैन्यातील एक हुद्दा
२३. घागरा
२४. बर्फाचा पर्वत
२५. अभय देणे
२७. श्रीमंत
२८. वहिवाट, शेत
२९. संपणे
३०. चुकीचे
३१. करार, भिस्त
३३. चांदणे प्रिय असणारा पक्षी
३५. स्वच्छ
३७. घर
३९. विपत्तीची कहाणी
४१. कणसातील दाणे
४३. सज्जनगडचे संत
४४. सार, अर्थ
४५. कुत्र्याच्या गळ्यातील वादी
४६. वर-वधू
४८. सरहद्द
४९. मुलांच्या भाषेत भांडणानंतरचा अबोला
५३. युद्ध
५५. लहान
५६. वेल
५८. जादू, भ्रम
५९. बाळाची बोलगाणी
६३. अतिशय हाल
६५. पावसाची झड
६६. राज्यघटना (हिंदी)
६७. गेरु
६८. पडते घेणे
७०. माया, प्रेम
७१. विविध
७३. संध्याकाळ
७४. हनुमान
७५. झकास, सुंदर
७६. राजकारणी यात्रा!
७७. रड्या माणूस
७८. मौल्यवान साठा

## उभे शब्द

१. ज्या जागेवरुन कोणीही हलवू शकत
२. राजाचा कालावधी
३. मोठ्ठीच गंमत,४. ऐट, दिमाख
५. वर्ण,
६. सोन्याचा धागा
७. '--- में हड्डी'
८. रस्ता, पर्थ
९. जिवलग मित्र
१०. समशेर
१३. लोकांचा समूह
१५. नवरा
१७. रत्न
१८. सूर्य, तापविणारा
१९. स्वयंपाकाचे शास्त्र
२२. सामान
२४. थंडीचे दिवस
२५. प्राण
२६. आशीर्वाद
२७. सावकार, श्रीमंत
२८. उत्तराधिकारी
२९. शाब्दिक हजामत
३२. दरवाजा
३३. हालचाल
३४. खरकट्याची रास
३६. पळून गेलेला
३८. हिंदीत दहा
४०. ओटा
४२. कर्ण
४४. तमाशा कलाकार
४७. उगाच भटकणे
४९. हस्त
५०. सर्वस्व
५१. भोळा (शंकर)
५२. लोखंडी वस्तूवरील गंज
५४. अभिप्राय
५७. चंद्र
५८. ममता, प्रेम
६०. डोंगर उतरण, ढाळ
६१. डासाचे चावणे
६२. गीत
६४. मिठी
६६. अनुमती, मान्यता
६८. टक, दृष्टी
६९. सहाय्य
७०. वारा
७१. बाई, स्त्री
७२. श्वान
७४. मुलांच्या भाषेत मांजर
७५. सिंहाचे पिल्लू

## आडवे उत्तर

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दारमदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

## उभे उत्तर

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा




## थोडक्यात/ संक्षिप्त

### धोनी आता ७ नाही तर या नंबरच्या जर्सीत दिसणार?

मुंबई,–आयपीएल २०२६ स्पर्धेचं बिगुल वाजलं आहे. या स्पर्धेला येत्या २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे. स्पर्धेतील पहिल्याच लढतीत गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा सामना बलाढ्य सनरायझर्स संघाविरूद्ध होणार आहे. त्यामुळे पहिल्याच सामन्यात चौकार आणि षटकारांचा पाऊस पाहायला मिळू शकतो. पण स्पर्धेला सुरूवात होण्याआधी एमएस धोनीची चर्चा रंगली आहे. यावेळी त्याचा जर्सी नंबर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आहे. नेमकं कारण काय? जाणून घ्या. आयपीएल २०२६ स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज संघ आपला पहिला सामना राजस्थान रॉयल्स संघाविरूद्ध खेळणार आहे. या स्पर्धेला सुरूवात होण्याआधी धोनीने आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. क्रिकेटमध्ये ७ क्रमांकाची जर्सी म्हटलं, तर सर्वांना लगेच एमएस धोनी आठवतो. पण यावेळी तो ७ नव्हे, तर ८ क्रमांकाची जर्सी परिधान करून मैदानात उतरणार असल्याचं म्हटलं जात आहे. धोनीने आपल्या सोशल मीडियावर अकाऊंटवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओला कॅप्शन देत त्याने लिहिले की, मफ७ क्रमांकाची आठवण नेहमी मनात कायम असेल, पण आता बदल करण्याची वेळ आली आहे.

### इंटरनॅशनल खेळाडूला विष देऊन मारले, पत्नीवर संशय...

मुंबई,–आयपीएल २०२६ च्या १९ व्या मोसमाला २८ मार्चपासून सुरूवात होणार आहे. मोसमाचा पहिला सामना गतविजेती आरसीबी आणि सनरायजर्स हैदराबादमध्ये होईल, तर २९ तारखेला होणाऱ्या दुसऱ्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि केकेआर यांच्यात होणार आहे. पण त्याआधीच मुंबई इंडियन्सकडून खेळणाऱ्या एका ऑलराऊंडरच्या आयुष्याची धक्कादायक कहाणी समोर आली आहे. या खेळाडूचे वडील आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले, पण त्यांचा संशयास्पद मृत्यू झाला आणि या मृत्यूचे आरोप थेट पत्नीवर झाले. १९९२ साली दक्षिण आफ्रिकेच्या टीमने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन केलं, तेव्हा एलन डोनाल्डसोबत खांद्याला खांदा लावून टर्शियस बॉश नावाचा खेळाडू फास्ट बॉलिंग करत होता. टर्शियस बॉशने १९९२ साली दक्षिण आफ्रिकेकडून एकमेव टेस्ट आणि २ वनडे खेळल्या, पण २००० साली वयाच्या फक्त ३३ व्या वर्षी टर्शियस बॉशचा मृत्यू झाला. टर्शियस बॉशच्या मृत्यूचं अधिकृत कारण गुइलेन–बॅरे सिंड्रोम सांगण्यात आलं, जो एक दुर्लभ न्यूरोलॉजिकल आजार आहे, पण बॉश यांच्या मृत्यूनंतर या प्रकरणाला नाट्यमय वळण लागलं.

टर्शियसच्या मृत्यूनंतर त्याची बहिण रीता व्हॅन व्हेटनने हा मृत्यू नैसर्गिक नसल्याचा संशय व्यक्त केला, त्यामुळे मृत्यूच्या १८ महिन्यांनंतर टर्शियस यांचा पुरलेला मृतदेह जमिनीतून बाहेर काढण्यात आला गेला.

### हार्दिक पांड्याला बाजूला करून सूर्यकुमार यादव कसा झाला टी२० चा कॅप्टन?

दिल्ली,–टीम इंडियाने टी२० विश्वचषक जिंकल्यानंतर आता अनेक गोष्टी समोर येत आहेत. काय कसं प्लॅनिंग झालं? कशी कोणाला जबाबदारी मिळाली? याबद्दल अनेक गोष्टी समोर येत आहेत. अशातच टीम इंडियाने टी२० विश्वचषक जिंकल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव याने प्रथमच उघडपणे सांगितले की त्याला टी२० संघाची कर्णधारपद देत कशी जबाबदारी मिळाली. २०२४ च्या विश्वचषक विजयानंतर नेतृत्वात झालेला बदल अनेकांसाठी आश्चर्यकारक ठरला होता, कारण त्या वेळी हार्दिक पांड्या हा प्रमुख दावेदार मानला जात होता. बार्बाडोस येथे भारताने विजेतपद मिळवल्यानंतर काही दिवसांनीच या निर्णयाची प्रक्रिया सुरू झाली. रोहित शर्मा याने टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर नवीन कर्णधाराची निवड आवश्यक होती. २०२२–२३ दरम्यान रोहित आणि विराट कोहली विश्रांतीवर असताना हार्दिकने संघाचे नेतृत्व केले होते, त्यामुळे तोच पुढील कर्णधार होईल अशी सर्वांची अपेक्षा होती.

मात्र, निवड समितीने वेगळा निर्णय घेत सूर्यकुमार यादव यांच्यावर विश्वास दाखवला. त्यांनी सांगितले की श्रीलंका दौऱ्याच्या काही दिवस आधी त्यांना त्या वेळचे बीसीसीआय सचिव जय शहा यांचा फोन आला.

# हॉकी विश्वचषकात पुन्हा रंगणार भारत-पाकिस्तान हाय-व्होल्टेज सामना; १९ ऑगस्टची तारीख निश्चित

**नेदरलँड्स आणि बेल्जियम येथे होणाऱ्या पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान एकाच ‘ड’ गटात असून १९ ऑगस्ट रोजी या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये महामुकाबला रंगणार आहे.**




लुसाने : पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या भारत आणि पाकिस्तान संघांना पुरुष हॉकी विश्वचषक स्पर्धेतही एकाच ‘ड’ गटात स्थान देण्यात आले आहे. ही स्पर्धा या वर्षी नेदरलँड्स आणि बेल्जियम यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणार आहे. गटात बलाढ्य इंग्लंड आणि वेल्स हे अन्य दोन संघ असतील. ॲम्स्टरडॅममधील ऐतिहासिक वागेनर स्टेडियमवर स्पर्धेचा गट विभागणी सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्याच वेळी महिला विश्वचषक स्पर्धेची देखील गटवारी निश्चित करण्यात आली. ही स्पर्धा १५ ते ३० ऑगस्ट दरम्यान होणार असून, भारतीय महिला संघाचा चीन, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेसोबत ‘ड’ गटातच समावेश करण्यात आला आहे.

आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने (एफआयएच) दिलेल्या माहितीनुसार, पुरुष आणि महिला गटातील सर्व साखळी सामने नेदरलँड्समध्ये होणार आहेत. स्पर्धेचे संपूर्ण वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

भारत–पाकिस्तान सामना १९ ऑगस्टला विश्वचषक हॉकी स्पर्धेची गटवारी निश्चित झाल्यावर २४ तासांत आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाने सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले. भारताचा सलामीचा सामना १७ ऑगस्टला वेल्सविरुद्ध होईल. त्यानंतर १८ ऑगस्टला इंग्लंडविरुद्ध आणि सर्वात शेवटी १९ ऑगस्टला पाकिस्तानशी खेळेल. महिला संघ सलामीला १६ ऑगस्ट रोजी चीनशी आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिका (१८ ऑगस्ट) आणि इंग्लंडशी (२० ऑगस्ट) खेळेल.

पुरुष

‘अ’ गट : नेदरलँड्स, अर्जेंटिना, न्यूझीलंड, जपान

‘ब’ गट : बेल्जियम, जर्मनी, फ्रान्स, मलेशिया

‘क’ गट : ऑस्ट्रेलिया, स्पेन, आयर्लंड, दक्षिण आफ्रिका

‘ड’ गट : इंग्लंड, भारत, पाकिस्तान, वेल्स महिला–‘अ’ गट : नेदरलँड्स, ऑस्ट्रेलिया, चिली, जपान

‘ब’ गट : अर्जेंटिना, जर्मनी, अमेरिका, स्कॉटलंड ‘क’ गट : बेल्जियम, स्पेन, न्यूझीलंड, आयर्लंड ‘ड’ गट : चीन, इंग्लंड, भारत, दक्षिण आफ्रिका

# फील्डिंगने सर्वांना थक्क करणाऱ्या फिलिप्सने आता आकाशात भरारी

मुंबई –न्यूझीलंडचा धडाकेबाज क्रिकेटर ग्लेन फिलिप्स सध्या सोशल मीडियावर तुफान चर्चेत आहे. त्याला कारण ठरला आहे तो त्याचा एक नवाकोरा व्हिडिओ. मैदानात आपल्या मपॉवर–हिटरफइमेज आणि जबरदस्त फील्डिंगने सर्वांना थक्क करणाऱ्या फिलिप्सने आता आकाशात भरारी घेतली आहे. ऑकलंडच्या आकाशात स्वत: विमान उडवतानाचा त्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, चाहते त्याच्या अष्टपैलू प्रतिभेला पाहून पुन्हा एकदा अवाक झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, ग्लेन फिलिप्स गेल्या काही काळापासून खासगी विमानाचे पायलट होण्याचे प्रशिक्षण (इत्ब्हु थेदह) घेत होता. व्हायरल व्हिडिओमध्ये फिलिप्स मोठ्या आत्मविश्वासाने आणि आनंदाने विमान चालवताना दिसत आहे. केवळ विमान उडवणेच नाही, तर त्याने विमानाचे लँडिंग देखील अत्यंत सफाईदारपणे केले. क्रिकेटच्या मैदानावर ज्याप्रमाणे तो दबावाखाली चांगली कामगिरी करतो, तशीच शांतता त्याने विमानाचा कंट्रोल सांभाळताना दाखवली.

एक ममल्टी–टॅलेंटेडफ खेळाडू: क्रिकेटपासून ते पॉवरलिफ्टिंगपर्यत फिलिप्सचा हा नवा छंद आणि कौशल्य पाहून चाहत्यांनी सोशल मीडियावर त्याच्या कौतुकाचा वर्षाव केला आहे. अनेकांनी त्याला मसुपरमॅनफ अशी उपमा दिली आहे. ग्लेन फिलिप्स हा एक अत्यंत गुणवान आणि अष्टपैलू खेळाडू आहे, हे त्याने अनेकदा सिद्ध केले आहे.

फिलिप्स त्याची आक्रमक फलंदाजीसाठी प्रसिद्ध आहे. टी–२० फॉरमॅटमध्ये तो एक जबरदस्त फिनिशर आहे.

जगातील सर्वोत्कृष्ट फील्डर

अनेक क्रिकेट पंडित आणि चाहते त्याला सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्कृष्ट फील्डर मानतात. त्याच्या कॅचेस आणि डायव्ह्स पाहून डोळ्यांचे पारणे फिटते.

यष्टिरक्षक केवळ फील्डिंगच नाही, तर तो उत्तम यष्टिरक्षण देखील करू शकतो, ज्यामुळे तो संघाला एक अतिरिक्त पर्याय देतो.

ऑफ–स्पिनर–तो एक उपयुक्त ऑफ–स्पिन गोलंदाज आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याने पाच विकेट्स घेण्याचा कारनामा देखील केला आहे.

पॉवरलिफ्टर–केवळ मैदानातच नाही, तर जीममध्येही त्याचा जलवा आहे. फिलिप्स आश्चर्यकारकरित्या ४०८ पाउंड्स (सुमारे १८५ किलो) वजन बेंच प्रेस करू शकतो.

जलतरणपटू : तो एक उत्कृष्ट पोहणारा देखील आहे, जे त्याच्या फिटनेसबद्दल बरेच काही सांगते.चाहते झाले फिदा–फिलिप्सच्या विमान उडवतानाच्या व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एका चाहत्याने लिहिले, मफतो फलंदाजी करतो, गोलंदाजी करतो, विकेट कीपिंग करतो, जगातील सर्वोत्तम फील्डर आहे, ४०० पाउंड वजन उचलतो आणि आता विमानही उडवतो? हा माणूस नक्की काय करू शकत नाही? त्याच्या या नवीन कौशल्याबद्दल क्रिकेट जगताकडूनही त्याचे कौतुक होत आहे.



# आयपीएलवरून आमदार रोहित पवारांची खास पोस्ट!

मुंबई,–इंडियन प्रीमियर लीग म्हणजेच आयपीएल आज केवळ क्रिकेट स्पर्धा राहिलेली नाही, तर देशभरातील लोकांना एकत्र आणणारा उत्सव बनला आहे, असे मत रोहित पवार यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे क्रीडा आणि राजकारणाच्या संगमावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. रोहित पवार यांनी एक खास व्हिडीओ आणि पोस्ट करत लिहले की, आयपीएल ही जाती, धर्म आणि प्रांत यांच्या पलीकडे जाऊन लोकांना जोडणारी स्पर्धा आहे. ''ही फक्त क्रिकेट लीग नाही, तर एक लोकोत्सव आहे,'' असे त्यांनी नमूद केले. त्यांनी या लीगची सुरुवात करण्यामागील दूरदृष्टीबद्दल शरद पवार यांचे विशेष कौतुकही केले. त्यांच्या मते, या संकल्पनेमुळे आयपीएलने आज प्रत्येक भारतीयाच्या मनात वेगळी जागा निर्माण केली आहे.

पुण्यातील सामन्यांबाबतही भाष्य पुढे बोलताना पवार यांनी पुण्यातील सामन्यांबाबतही भाष्य केले. आयपीएलमधील दोन मोठ्या संघांपैकी एक संघ महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन च्या पुण्यातील मैदानावर सामने खेळणार होता, असे त्यांनी सांगितले. मात्र, काही कारणांमुळे हा निर्णय बदलला गेला. ''दुर्दैवाने, खेळातही कधी कधी राजकारण आडवे येते,'' असे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे या निर्णयामागील कारणांबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे.आयपीएलच्या नवीन सिजनमुळे आनंद तरीही, आयपीएल लवकरच सुरू होत असल्याचा आनंद व्यक्त करत त्यांनी चाहत्यांना उत्साहाने स्पर्धेचा आनंद घेण्याचे आवाहन केले. क्रिकेटप्रेमींमध्ये आधीच आयपीएलची उत्सुकता शिगेला पोहोचली असून, प्रत्येक संघ आपल्या तयारीत व्यस्त आहे. दरम्यान, पवार यांच्या या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा क्रीडा क्षेत्रातील राजकीय हस्तक्षेपाचा मुद्दा चर्चेत आला आहे. अनेक क्रीडा जाणकारांचे मत आहे की, अशा मोठ्या स्पर्धांमध्ये निर्णय पारदर्शक आणि केवळ क्रीडासंबंधित असावेत.

क्रीडा आणि राजकारण यांच्यातील सीमारेषा चर्चेत

एकीकडे आयपीएलच्या नव्या हंगामाची चाहूल लागली असताना, दुसरीकडे अशा वक्तव्यांमुळे क्रीडा आणि राजकारण यांच्यातील सीमारेषा पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरत आहे.कधी पासून सुरु होणार नवीन सीजन?दरम्यान, आयपीएल २०२६ सिजनची सुरुवात २८ मार्चपासून होणार असून पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात होण्याची शक्यता आहे. या हंगामात एकूण १० संघ सहभागी होणार असून प्रत्येक संघाने आपापल्या तयारीला वेग दिला आहे.आयपीएल २०२६चे प्रमुख संघ– आयपीएल २०२६ च्या हंगामात एकूण १० संघ सहभागी होणार आहेत. खालीलप्रमाणे सर्व संघांची यादी: मुंबई इंडियन्स चेन्नई सुपर किंग्ज रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर सर्व संघांनी त्यांच्या कर्णधारांची घोषणा केली असून, या हंगामासाठी प्रत्येक संघाच्या

# पाकिस्तान क्रिकेटमध्ये नवा स्कॅम, टी२० वर्ल्ड कपमध्ये दोन दिग्गजांनी टीमलाच धोका दिला!




कराची,–टी–२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानचं आव्हान सुपर–८ स्टेजलाच संपुष्टात आलं, त्यानंतर पाकिस्तानच्या टीमवर त्यांचे क्रिकेट चाहते आणि माजी क्रिकेटपटूंनी सडकून टीका केली. टी–२० वर्ल्ड कपमधल्या खराब कामगिरीनंतर बांगलादेशविरुद्धच्या वनडे सीरिजमधून पाकिस्तानने बाबर आझमला डच्चू दिला. आता टी–२० वर्ल्ड कपवेळी पाकिस्तान क्रिकेटमध्ये झालेला नवा फ्रॉड समोर आला आहे.

टी–२० वर्ल्ड कपमध्ये निवड झालेले बाबर आझम आणि फखर झमान हे दोन्ही खेळाडू पूर्णपणे फिट नव्हते, असा मेडिकल रिपोर्ट पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या मेडिकल पॅनलने दिला आहे. बाबर आणि फखर टी–२० वर्ल्ड कपआधी त्यांच्या दुखापतीतून पूर्णपणे बरे झाले नव्हते, असा धक्कादायक खुलासा मेडिकल पॅनलने केला आहे. या प्रकरणी पाकिस्तानचे सीनियर सिलेक्टर आकिब जावेद यांनीही मागच्या आठवड्यात झालेल्या पत्रकार परिषदेत प्रश्न उपस्थित केले होते आणि निवड प्रक्रियेच्या तपासणीची मागणी केली होती.

यूकेचे स्पोर्ट्स फिजियोथेरपिस्ट डॉ. जावेद मुगल यांनी वर्ल्ड कपनंतर दोन्ही खेळाडूंची तपासणी केली आणि चिंता व्यक्त केली, अशी माहिती पीसीबीच्या सूत्रांनी दिली आहे. जानेवारी महिन्यापासून बाबर आझम आणि फखर झमान पाकिस्तान टीमच्या सोबत आहेत.बाबरचा स्थानिक टी–२० लीग खेळायला नकार

बाबर आझमने टी–२० वर्ल्ड कपमधून परत आल्यानंतर हॅम स्ट्रिंग दुखापतीचं कारण देऊन नॅशनल टी–२० चॅम्पियनशीप खेळायला नकार दिला. तर दुसरीकडे फखर झमानही बऱ्याच काळापासून दुखापतींचा सामना करत आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तपासणीमध्ये बाबर आझमची दुखापत सुरूवातीच्या आकलनापेक्षा जास्त गंभीर निघाली, तर फखर झमानलाही अनेक महिन्यांपासून या दुखापतीमुळे त्रास होत आहे.मेडिकल पॅनलने उपस्थित केलेल्या टीम सिलेक्शनच्या प्रश्नावर पाकिस्तानच्या निवड समितीने



## विराट कोहली बंगळूरुमध्ये दाखल

बंगळुरु,–रॉयल चॅलेंजर्स बंगळरूचा माजी कर्णधार आणि महान क्रिकेटपटू विराट कोहली आयपीएल २०२६ साठी संघात सामील झाला आहे. कोहली बुधवारी बंगळूरुमध्ये दाखल झाला. संघ व्यवस्थापन, क्रिकेटपटू आणि चाहते त्याच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत होते. बंगळूरुमध्ये येण्यापूर्वी कोहली लंडनमध्ये सराव करत होता. कोहलीने त्याच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सरावाचा एक फोटो देखील पोस्ट केला, जो आरसीबीने त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम प्लॅटफॉर्मवर शेअर केला. कोहलीच्या संघात सामील झाल्यामुळे सराव सत्रांना आणखी गती मिळणार आहे.

# आगामी होणाऱ्या २०२६ विश्वचषक वेळापत्रकावर फिफा ठाम



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानानंतर इराणने आपले विश्वचषकातील सामने मेक्सिकोत हलवण्याचा केलेला प्रयत्न फिफाने वेळापत्रकात बदल करण्यास नकार देऊन फेटाळून लावला आहे.

फिफा विश्वचषक स्पर्धेचे वेळापत्रक बदलण्यास प्रशासनाने नकार दिला असून सामने नियोजित ठिकाणीच पार पडतील.

जिनेव्हा : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानानंतर अमेरिकेत होणारे सामने मेक्सिकोत स्थानांतरित करण्याचे इराणचे प्रयत्न फोल ठरले आहेत. ‘फिफा’ने पूर्वनियोजित वेळापत्रक बदलण्यास नकार दिला आहे.




इराण संघाने विश्वचषक स्पर्धेसाठी अमेरिकेत येणे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य नाही अशी भूमिका ट्रम्प यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर इराणच्या विश्वचषक स्पर्धेतील सहभागावर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. याच सुमारास इराण फुटबॉल महासंघाने आपले सामने मेक्सिकोत स्थानांतरित करण्यासाठी ‘फिफा’ बरोबर चर्चा सुरू असल्याचे सांगितले.

इराणचे सामने मेक्सिकोत स्थानांतरित करण्याची चर्चा; मेक्सिकोमधील इराण दूतावासाची माहिती:

मेक्सिकोच्या अध्यक्षा क्लॉडिया शिनबॉम यांनी या प्रस्तावावर सकारात्मकता दर्शविली होती. अर्थात, यामध्ये ‘फिफा’ची भूमिका महत्त्वाची राहील. त्यांच्या निर्णयानंतर आम्ही अंतिम निर्णय घेऊ असे देखील त्या म्हणाल्या.

मात्र, असा बदल करण्याची कोणतीही योजना नसल्याचे ‘फिफा’ने स्पष्ट केले. इराणने अशी चर्चा सुरू असल्याचे सांगितले असले, तरी त्या वृत्ताला कुणाकडूनच दुजोरा मिळत नव्हता. या चर्चेचे वृत्त पसरल्यावर चोवीस तासात ‘फिफा’ने आपले मत व्यक्त केले असून, वेळापत्रक तीन महिन्यांपूर्वी निश्चित झाले आहे. ते बदलता येत नाही. स्पर्धेच्या नियोजनानुसार सामने पार पडतील अशी आम्हाला आशा आहे, अशी भूमिका ‘फिफा’ने घेतली आहे.

## सम्राट मित्र मंडळाच्यावतीने ईफ्तार पार्टीचे आयोजन



**अहमदपूर/प्रतिनिधी :** पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर सम्राट मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अहमदपूर शहरातील मौलाली नगर येथील उमर मस्जिद परिसरात रोजेदार बांधवांसाठी ईफ्तार पार्टीचे सुंदर आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हिंदू-मुस्लिम-दलित एकतेचा जिवंत संदेश. सामाजिक सलोखा, बंधुता आणि परस्पर प्रेम यांची प्रचिती देणारा हा उपक्रम युवक नेते डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबवत आहेत. संध्याकाळच्या शांत वातावरणात रोजेदारांनी उपवास सोडताना एक वेगळीच आध्यात्मिक आणि भावनिक अनुभूती सर्वांना लाभली. एका मोठ्या पटांगणात सर्वजण एकत्र बसून खजूर, फळे आणि अल्पोपहार घेताना दिसत होते.

धर्म, जात, पंथ या सर्व सीमा ओलांडत माणुसकीचा उत्सव साजरा होत असल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या ईफ्तार कार्यक्रमाला माजी सभापती जेष्ठ नेते दिलीपराव देशमुख,गोविंदराव गिरी, गफारखान पठाण,जाबेर पठाण, अजय भालेराव, शिवाजीराव गायकवाड,गणेश मुंडे, त्रीशरण मोहगावकर, भीमराव कांबळे, जकीभाई,शेख रहीमभाई, शेख सत्तारभाई,फारूख मणियार,इंजी.सोहेल पठाण उपस्थित होते.तसेच मुस्लिम बांधवांसह शहरातील पत्रकार मित्र,सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत, अशा कार्यक्रमांमुळे समाजात ऐक्य आणि सौहार्द अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त केली.

समाजात एकता आणि बंधुता टिकवण्यासाठी असे उपक्रम अत्यंत गरजेचे आहेत, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सम्राट मित्र मंडळाच्या या उपक्रमाने पुन्हा एकदा सिद्ध केले की, खरी ताकद ही एकतेतच आहे आणि माणुसकी हाच सर्वात मोठा धर्म आहे. या कार्यक्रमासाठी युवा नेते मोहम्मद पठाण,नौशाद सय्यद, शेख नूर,शेख महेबूबभाई आदींनी पुढाकार घेतला.

## लातुरात शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन : डॉ. मिलिंद पोतदार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या सावली सेंटर फॉर मेंटल हेल्थ अँड रिसर्च च्या द्विदशकपूर्तीचे औचित्य साधून शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांची मानसिकता : शिक्षकांना काय माहिती असायला हवे या विषयावरील विशेष कार्यशाळेसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. मिलिंद पोतदार, डॉ. मुग्धा पोतदार यांनी दिली.समाजात वावरताना प्रत्येकाला ताणतणावाचा सामना करावाच लागतो. त्यामुळे सरासरी दहापैकी चार जणांना समुपदेशनाची नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आरोग्यसेवेसोबतच सामाजिक कार्यातही आपला खारीचा वाटा उचलण्याचे काम आपण सातत्याने करत असून येत्या शनिवार दि. २१ मार्च २०२६ रोजी दुपारी अडीच वाजता लातूर आणि परिसरातील शिक्षकांसाठी विशेष कार्यशाळा डॉ. भूषण शुक्ल यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर कांचन सभागृहात होणार आहे. या कार्यशाळेसाठी ८५ शाळांमधील प्रत्येकी दोन शिक्षकांना निमंत्रित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच रविवार दि. २२ मार्च रोजी सकाळी अकरा वाजता हॉटेल ग्रँड येथे बालरोगतज्ञ, मानसोपचार तज्ञ आणि न्यूरोलॉजिस्ट यांच्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी पाच वाजता दगडोजीराव देशमुख सभागृहात पुण्याचे प्रसिद्ध बालमानसोपचार तज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल यांच्या प्रमुख उपस्थितीत तंत्रज्ञान युगातील पालकत्व कानगोष्टी पालकत्वाच्या या विषयावर पालकशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित मानसिक आरोग्य विषयावरील निबंध स्पर्धा आणि रिल्स स्पर्धा यांच्या विजेत्यांचा गौरवदेखील करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे दि. २८ व २९ मार्च रोजी दोन दिवसीय नाट्यमहोत्सव आयोजित केला आहे. यामध्ये आनंद ओवरी, मन (संवेदनशील मनाची स्पंदने), मग तू मला खा, तो राजहंस एक या नाटकांचे प्रयोग सादर होणार आहेत. प्रत्येक दिवशी दोन नाटके सादर केली जाणार असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले. आपल्या हॉस्पिटलमध्ये आजमितीस मानसिक आजाराच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. आपल्या देशात १० ते १२ हजार मानसोपचार तज्ज्ञ उपलब्ध असून ताणतणावांसह विविध प्रकारच्या मानसिक कारणावरून किमान १५ ते १८ कोटी लोकांना कोणत्या ना कोणत्या उपचाराची आवश्यकता भासू शकते.त्यामुळे मानसिक आरोग्यावरही प्राधान्याने विचार होणे गरजेचे असल्याचे डॉ. पोतदार यांनी सांगितले.

# रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी संसदेतील प्रश्नांना उत्तर देताना रेल्वे क्षेत्रातील प्रमुख संरचनात्मक सुधारणा अधोरेखित केल्या; महाराष्ट्राला याचा मोठा लाभ होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** माननीय रेल्वे मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी १७.०३.२०२६ रोजी खासदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देताना, भारतीय रेल्वेमध्ये हाती घेण्यात आलेल्या अनेक प्रमुख संरचनात्मक सुधारणांवर प्रकाश टाकला.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये भारतीय रेल्वेला सुमारे ₹२.७८ लाख कोटींची विक्रमी अर्थसंकल्पीय तरतूद प्राप्त झाली आहे.

२०२५-२६ या वर्षात विविध गंतव्यस्थानांसाठी ७१,००० विशेष गाड्या चालवण्यात आल्या, ज्यातून लाखो प्रवाशांनी प्रवास केला.

७५ स्थानकांवर प्रवाशांना सामावून घेण्यासाठी होल्डिंग एरिया (प्रतीक्षा कक्ष) उभारले जात आहेत.

₹६०,००० कोटींचे अनुदान दिले जात आहे; याचा अर्थ असा की, प्रत्येक प्रवाशाला सुमारे ४५% सवलत मिळते. यामुळे भारतीय रेल्वे हे जगातील सर्वात किफायतशीर वाहतूक साधनांपैकी एक बनले आहे.

स्थानक पुनर्विकास कार्यक्रमाअंतर्गत १,३०० स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे; यापैकी १८० स्थानकांचे काम पूर्ण झाले आहे, ५०० स्थानकांचे काम अंतिम टप्प्यात आहे आणि उर्वरित स्थानकांवरील काम वेगाने सुरू आहे.

महाराष्ट्र आणि मुंबईशी संबंधित प्रमुख ठळक बाबी

केंद्र सरकार मुंबईच्या उपनगरीय रेल्वे सेवांसाठी ३,००० कोटी रुपयांचे अनुदान पुरवते, ज्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना परवडणारा प्रवास करणे शक्य होते.

प्रवाशांची सुरक्षा वाढवण्यासाठी मुंबईकरिता २३८ नवीन, पूर्णपणे स्वयंचलित दरवाजे असलेल्या उपनगरीय गाड्यांची निर्मिती केली जात आहे. मुंबई आणि पुणे यांसह ४८ शहरांमध्ये क्षमता वाढवण्याची कामे प्रगतीपथावर आहेत; यामध्ये नवीन फलाट (प्लॅटफॉर्म), स्टेबलिंग लाईन्स, पिट लाईन्स, कोचिंग टर्मिनल्स आणि इतर पायाभूत सुविधांच्या उभारणीचा समावेश आहे.



सात बुलेट ट्रेन प्रकल्पांचे नियोजन सुरू आहे; यामध्ये मुंबई-पुणे बुलेट ट्रेन प्रकल्पाचा समावेश असून, यामुळे प्रवासाचा वेळ केवळ ४८ मिनिटांपर्यंत कमी होईल. तसेच, पुणे-हैदराबाद प्रकल्पाद्वारे प्रवासाचा वेळ सुमारे २ तासांपर्यंत कमी होणे अपेक्षित आहे.

नाशिक, उज्जैन, हरिद्वार, राजमहेंद्री आणि कुंभकोणम येथील कुंभमेळ्याच्या तयारीची कामे वेगाने सुरू आहेत. नाशिक कुंभ मेळ्यासाठी, नाशिक रोड, देवळाली, ओढा, खेरवाडी आणि कसबे सुकाणे या स्थानकांसाठी एक सविस्तर मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. १७ नवीन रोड ओव्हर ब्रिजेस आणि १९ नवीन भुयारी मार्गांच्या बांधकामाचे काम सध्या सुरू आहे.

बुलेट ट्रेन प्रकल्प

बुलेट ट्रेन प्रकल्पाचे काम वेगाने सुरू असून, यामध्ये भारताच्या पहिल्या पाण्याखालील बोगद्याच्या (अंडर सी टनेल) बांधकामाचाही समावेश आहे.

या प्रकल्पांतर्गत एकूण २१ किलोमीटर लांबीच्या ७ बोगद्यांचे नियोजन करण्यात आले आहे; यापैकी ५ किलोमीटरचे काम पूर्ण झाले असून, दोन बोगद्यांचे आरपार जोडणीचे काम (ब्रेकथ्रू) साध्य करण्यात आले आहे.

या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत ४३५ किलोमीटर पायाभरणीचे काम, ४२६ किलोमीटर खांबांचे बांधकाम, ३३८ गर्डर्स उभारणे, १६८ किलोमीटर रेल्वे रुळ टाकणे आणि १४६ किलोमीटर ओएचई (ओव्हरहेड इलेक्ट्रिक) खांबांचे काम पूर्ण झाले आहे.

या प्रकल्पाचाच एक भाग म्हणून, १७ नद्यांवर पुलांचे बांधकामही करण्यात येत आहे.

## जिद्द आणि चिकाटीतून यशाला गवसणी - डॉ. प्रितम भाले




**लातूर/प्रतिनिधी :** यशस्वी होण्याची जिद्द आणि चिकाटीमुळे यशाला गवसणी घालू शकलो असे प्रतिपादन डॉ. प्रितमकुमार भाले यांनी व्यक्त केले. युपीएससीत यश संपादन केल्याबद्दल आयोजित सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी नूतन नगरसेवक भीमाशंकर बेंबळकर, नगरसेविका रागिणी यादव, बाबुराव भाले, धर्मेंद्र चौहान यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल विक्रम नगरातील श्रावस्ती बुद्ध विहार या ठिकाणी विक्रम नगर वासियांच्या वतीने डॉ. प्रितमकुमार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना डॉ. भाले म्हणाले की बालपणापासून घरात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वारसा, समाजासाठी कांहीतरी करण्याची इच्छा होती. ती उच्च शिक्षणाशिवाय पूर्ण करू शकत नाही याची जाणीव झाली. घरातील वडीलधाऱ्या मंडळीच्या सहकार्याने शिक्षण घेऊन आज भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकलो. यश मिळू शकते, त्यासाठी सातत्य आणि परिश्रम महत्वाचे आहे. मुलांनी वेळेचा अपव्यय टाळून आम्हाला भगवान गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या यशस्वी मार्गाचा अवलंब करावा अशा भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. विलास घारगावकर तर आभार रागिणी यादव यांनी मानले. यावेळी यावेळी रमेश सरवदे,राहुल कांबळे, यशपाल कांबळे,शुभम कांबळे,कुसुमताई बानाटे, ज्योतीताई घारगावकर,डॉ. वैभवी कांबळे, विजया सरवदे,टिकू माने यांच्यासह परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांचे स्वागत



**लातूर/प्रतिनिधी :** विभागीय शिक्षण उपसंचालकपदी दीपक चवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला असता लातूर जिल्हा संस्थाचालक संघटनेच्यावतीने फ ेटा, शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी नुकतीच स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने या रिक्त पदावर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील दीपक चवणे यांची नियुक्ती केली आहे. चवणे यांनी पदभार स्वीकारला असता त्यांच्या सुविद्य पत्नी हिंगोली 'डायट'च्या प्राचार्या जयश्री चवणे यांच्यासह त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक संघटनेचे माजी राज्य अध्यक्ष वसंतराव पाटील, संस्थाचालक संघटनेचे अध्यक्ष रामदास पवार, सचिव बाबूराव जाधव, कोषाध्यक्ष प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्रा. गोविंदराव घार, कालिदास माने, पी. एन. बंडगर, जे. जी. सगरे, मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश देशमुख, सचिव बी. जी. चोले आदी उपस्थित होते.

# दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकरला राष्ट्रीय युवक महोत्सवात स्किट कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक

## दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते सत्कार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित, दयानंद विज्ञान महाविद्यालयातील बी.एस्सी.बी.टी. तृतीय वर्षातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट (लघुनाटिका) या कलाप्रकारात चेन्नई येथे पार पडलेल्या राष्ट्रीय युवक महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळविलेला आहे.सदरील राष्ट्रीय युवक महोत्सवात नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने तब्बल २६ वर्षानंतर सुवर्णझेप घेत व ऐतिहासिक यश मिळवित देशातील आठ झोनमधील १४२ नामांकित विद्यापीठांमध्ये झालेल्या चुरशीच्या लढतीत विद्यापीठाने एकूण सात कलाप्रकारात यश मिळविलेले आहे.त्यामध्ये दयानंद विज्ञान महाविद्यालयातील आर्यन गिरवलकर या विद्यार्थ्याने स्किट या एका कलाप्रकारात द्वितीय क्रमांक मिळवून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे, दयानंद शिक्षण संस्था व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर झळकाविलेले आहे.





त्याबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी त्याचे अभिनंदन केले तसेच संस्थेचे सचिव रमेश बियाणी यांच्या हस्ते त्याचा यथोचित सत्कार करण्यात आला.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य अनिलकुमार माळी,कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी, डॉ.कोमल गोमारे, प्रा.कविता जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.याचबरोबर स्वारातीम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ.अशोक महाजन यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी त्याचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

यापूर्वी दयानंद विज्ञानच्या आर्यन गिरवलकर याने आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव- २०२५ मध्ये मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात पहिले पारितोषिक मिळविले.आंतर विद्यापीठ युवक महोत्सव (इंद्रधनुष्य) २०२५ मध्ये माईम (मूक अभिनय), वन ऍक्ट प्ले (एकांकिका) तसेच मिमिक्री (नक्कल) या कलाप्रकारात आपला सहभाग नोंदविला. ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सेंट्रल झोनल युवक महोत्सवमध्ये स्किट (विडंबन) या कलाप्रकारात द्वितीय पारितोषिक तसेच क्रिएटिव्ह डान्स याही कलाप्रकारात सहभाग नोंदवून द्वितीय पारितोषिक मिळविले.तसेच सत्यभामा विद्यापीठ, चेन्नई,एमजीएम विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठ, जळगाव येथील विद्यापीठाच्या स्पर्धेतही त्यांनी घवघवीत यश मिळविलेले आहे.

## श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्ताने विविध कार्यक्रम


## नववर्षाचे स्वागत भव्य शोभायात्रा

**लातूर/प्रतिनिधी :** राम गल्ली येथील श्रीराम मंदिर संस्थान यांच्या वतीने चैत्र शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा निमित्ताने तसेच श्रीराम जन्मोत्सवाचे औचित्य साधून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी १९ मार्च २०२६ दुपारी ४.०० वाजता हिंदू नववर्षाचे स्वागत करण्यासाठी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. त्यानंतर २० ते २५ मार्च दरम्यान दररोज सकाळी ८.०० वाजता अभिषेकाचे आयोजन करण्यात आले आहे.याचबरोबर दररोज दुपारी ३.०० वाजता विविध भजनी मंडळांचे सादरीकरण होणार आहे. दररोज सायंकाळी ७ वाजता मान्यवरांचे व्याख्यान होणार आहे . २० मार्चला तुकाराम महाराज चिंचणीकर यांचे भवितव्य हिंदूचे , २१ मार्चला गौरवशास्त्री देशपांडे यांचे पंचांगातील विज्ञान, २२ मार्चला अक्षय व्हावले यांचा भावगीते श्रीरामाचे गायनाचा कार्यक्रम, २३ मार्चला राजेशजी संन्यासी यांचे



कुटुंब प्रबोधन या विषयावर , २४ मार्चला योगेश महाराज सालेगावकर व रेणुका मिसळ यांचे शिवचरित्र व रामायणातील विषयांवर प्रवचन होणार आहे . २५ मार्चला डॉ विवेक सौताडेकर यांचे रत्नापूर ते लातूर या विषयावर व्याख्यान होणार आहे, दि. २६ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यादिवशी सकाळी १० ते १२ यावेळेत अप्पाराव कुलकर्णी यांचे प्रवर्चन होणार आहे . दररोज सायंकाळी ५.३० वाजता रामरक्षा व हनुमान चालीसा पठणाचे आयोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शिपाईपासून रजिस्टर पर्यंतची प्रेरणादायी वाटचाल – गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर ३३ वर्षांचा प्रवास उजळला



गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर एका कर्मचाऱ्याच्या ३३,वर्षांच्या कष्टमय आणि प्रेरणादायी प्रवासाची कहाणी सर्वांसमोर आली आहे. शिपाई म्हणून सेवेला सुरुवात करून आज रजिस्टर (कार्यालयीन प्रमुख पद) पर्यंत पोहोचलेल्या या व्यक्तीची वाटचाल अनेकांसाठी आदर्श ठरत आहे.

सन १९९३ मध्ये साध्या शिपाई पदावर रुजू झालेल्या या कर्मचाऱ्याने प्रामाणिकपणा, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर आपली ओळख निर्माण केली. सुरुवातीच्या काळात मर्यादित साधने, आर्थिक अडचणी आणि जबाबदाऱ्यांचा सामना करत त्यांनी कामात सातत्य ठेवले. प्रत्येक कामाला त्यांनी मनापासून न्याय दिला.

दरम्यानच्या काळात त्यांनी स्वतःचे शिक्षणही पूर्ण केले. नोकरी सांभाळत अभ्यास करणे ही मोठी कसरत होती, मात्र त्यांनी हार मानली नाही. त्यांच्या या जिद्दीमुळेच त्यांना वेळोवेळी पदोन्नती मिळत गेली आणि अखेर त्यांनी रजिस्टर पदापर्यंत मजल मारली.

गुढीपाडवा हा नवीन वर्षाची सुरुवात आणि नव्या संधींचा सण मानला जातो. याच दिवशी त्यांच्या ३३ वर्षांच्या सेवेला उजाळा देण्यात आला. कार्यालयातील सहकारी आणि वरिष्ठांनी त्यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याची दखल घेतली.

या प्रसंगी बोलताना श्री हनुमंत जाधव यांनी सांगितले की, कधीही छोट्या कामाची लाज बाळगू नका. मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्य ठेवल्यास यश नक्की मिळते.

हनुमंत अच्युतराव जाधव या यशोगाथेमुळे तरुण पिढीला नवी प्रेरणा मिळत आहे. शिपाईपासून रजिस्टरपर्यंतचा हा प्रवास केवळ पदोन्नतीचा नाही, तर संघर्ष, जिद्द आणि आत्मविश्वासाचा आदर्श नमुना ठरला आहे.

**– शब्दांकन विलास मुळीक**

# नृत्याविष्कार अन् सन्मान:सुयोग फाउंडेशनमध्ये चिमुकल्यांचे स्नेहसंमेलन अन् महिला दिनानिमित्त सन्मान सोहळा उत्साहात



तामलवाडी(प्रतिनिधी) –मागील पाच–सहा वर्षांपासून मी साखर कारखानदारी क्षेत्रात कार्यरत असले तरी तामलवाडीशी असलेली पंचवीस वर्षांची नाळ आजही तितकीच घट्ट आहे. ग्रामीण भागातील स्त्रियांना शहरांच्या तुलनेत मोठा संघर्ष करावा लागतो. महिला प्रत्येक क्षेत्रात आपले वेगळे वैशिष्ट्य दाखवत आहेत, ही सर्व महिलांसाठी अभिमानाची व कौतुकाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांनी केले.

येथील सुयोग फाऊंडेशन, तामलवाडी यांच्या वतीने संस्थेचे २६ वे स्नेहसंमेलन तसेच जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला तामलवाडी परिसरातील ३०० महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

संस्था सचिव डॉ. राजलक्ष्मी गायकवाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून सौंदर्यतज्ज्ञ डॉ. जयसुधा कोठा तसेच आहारतज्ज्ञ डॉ. श्रद्धा पवार, डॉ. रविराज गायकवाड हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महिला दिनानिमित्त उपस्थित महिलांना शुभेच्छा देण्यात आल्या.

प्रास्ताविक वनिता धपाटे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. स्नेहा जाधव यांनी केले .या कार्यक्रमासाठी डॉ. रविराज गायकवाड, करिष्मा पटेल, रमिजा गाडिवान, राधा गायकवाड, प्रविण शिंदे, शुभांगी शिंदे, विनोद चुंगे, राजेंद्र माळी, एजाज कोतवाल, बाळू डोलारे आणि लक्ष्मण उत्तरवाड यांचे सहकार्य लाभले.

स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव कार्यक्रमात प्रथम बाल संस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांनी विविध कलांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर किशोरवयीन मुलींनी प्रभावी भाषणे सादर करून आत्मविश्वासपूर्ण विचार मांडले. याशिवाय शालेय मुलींसाठी दोरीउडी स्पर्धा, महाविद्यालयीन युवतींसाठी वेशभूषा स्पर्धा, सौभाग्यवतींसाठी केशरचना स्पर्धा तसेच सर्व महिलांसाठी विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व स्पर्धांमधील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरवण्यात आले.

# येडेश्वरी देवीच्या यात्रा काळात गॅसचा अतिरिक्त कोटा मंजूर करा येरमाळा : स्थानिक व्यावसायिकांची प्रशासनाकडे मागणी

येरमाळा : येथील श्री येडेश्वरी देवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेदरम्यान व्यावसायिक वापरासाठी लागणाऱ्या कमर्शियल गॅस सिलिंडरचा तुटवडा भासू नये, यासाठी किमान १० ते १५ दिवसांसाठी अतिरिक्त गॅस कोटा मंजूर करून सुरळीत पुरवठा करावा, अशी मागणी स्थानिक व्यावसायिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. संबंधित निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी स्वीकारले असून, त्यासोबत देवस्थान ट्रस्ट व ग्रामपंचायत कार्यालयाचे पत्रही जोडण्यात आले आहे.

येरमाळा येथे दरवर्षी चैत्र पौर्णिमेनिमित्त मोठी पारंपरिक यात्रा भरते. या यात्रेसाठी जिल्ह्यासह राज्यभरातून अंदाजे १० ते १५ लाख भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे परिसरात हॉटेल, मिठाई विक्रेते, खानावळी तसेच विविध खाद्यपदार्थांचे तात्पुरते स्टॉल मोठ्या प्रमाणावर उभारले जातात. परिणामी, कमर्शियल गॅस सिलिंडरची मागणी अनेकपटींनी वाढते.

सध्या उपलब्ध गॅस पुरवठा अपुरा पडण्याची शक्यता व्यक्त होत असून, यामुळे व्यापारी व भाविकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे यात्रेच्या कालावधीत अतिरिक्त गॅस कोटा मंजूर करून संबंधित वितरकांमार्फत तत्काळ पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने वेळीच उपाययोजना केल्यास गॅस टंचाई टाळता येऊन भाविकांची गैरसोय टळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


# कायद्याचा उपयोग सबलीकरणासाठी करावा तालुका ब्राह्मण महिला संघटनेतर्फे महिलांच्या सन्मानप्रसंगी ॲड. शुभदा पोतदार यांचे प्रतिपादन



उमरगा(प्रतिनिधी)– स्त्री ही अबला नसून सबला आहे. आजही तिची समाजातील व कुटुंबातील भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. सद्यःस्थितीत स्त्रियांच्या सबलीकरणासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. त्याचा समाजातील अनेक महिलांना फायदा होतो. फक्त महिलांनी त्याचा वापर आपल्या प्रगतीसाठी व एकतेसाठी केला पाहिजे. महिला पुरुष हे समान आहेत, कुठेही भेदभाव केला जात नाही. स्त्रियांसाठी जमेची बाजू आहे. असे मत ॲड. शुभदा पोतदार यांनी व्यक्त केले.

उमरग्यातील कुंभारवाडा येथील श्री परमेश्वरी देवी मंदिरात महिला दिनाचे औचित्य साधून तालुका ब्राम्हण महिला संघटनांकडून यशस्वी महिलांचा सन्मान व महिलांसाठी मनोरंजनात्मक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण सोहळ्यात ड. पोतदार अध्यक्षीय भाषणात बोलत होत्या. अश्विनी जोशी, डॉ. साधना इनामदार, प्रिया पवार आरती शिंदे, शिवाई किरण गायकवाड आदींची या वेळी उपस्थिती होती.

यावेळी ब्राह्मण संघटनेच्या अध्यक्षा कल्पना होदलुरकर, उपाध्यक्ष अश्विनी जोशी, सचिव अनिता बडवे, कोषाध्यक्षा धनश्री मुरूमकर आदींसह महिला उपस्थित होत्या.वर्षा शाईवाले यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रंजना पाटील यांनी केले. अंजू जोशी यांनी उपस्थित मान्यवर व महिलांचे आभार मानले.

# तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)– धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१७ मार्च रोजी मोटार वाहन कायदा–नियम भंग प्रकरणी एकुण १९६ कारवाया करुन १,४३,०५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.


## महाराष्ट्र शासन

## कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१ धाराशिव

## पत्ता–सिंचन भवन, आनंद नगर, धाराशिव

ईमेल-eekmed1@gmail.com दुरध्वनी क्र/.ईमेल-(02472)228745

## ई–निविदा सुचना क्र.१९ सन २०२५–२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाइन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1 धाराशिव यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव : हाजीआली मुंबई येथील विश्रामगृह इमारत क्र.१०, सदनिका क्र.ए–4 मधील संरचनात्मक दुरूस्ती, रंगकाम व इतर किरकोळ दुरूस्तीचे काम करणे. | |
| २. | कामाचा जिल्हा | : मुंबई (महाराष्ट्र राज्य) |
| ३. | निविदेची किंमत | : रु.३३.९३ लक्ष (वस्तु व सेवा कर वगळून) |
| ४. | ई निविदा उपलब्ध कालावधी | : दि. २०.०३.२०२६ ते दि.२७.०३.२०२६ |
| ५. | ई निविदा उघडण्याचा दिनांक | : दि. ३०.०३.२०२६ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे |
| ६. | इसारा / बयाना रक्कम | : रु. ३४०००/– |
| ७. | काम पूर्ण करण्याचा कालावधी | : ०६ महिने |
| ८. | ई निविदा संचाची किंमत | : रु. २३६०/– (वस्तु व सेवा कर सह) |
| ९. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | : सर्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे नोंदणीकृत कंत्राटदार (वर्ग ४ आणि वरिल) |

ई निविदा बाबत सर्व माहिती खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

i) शासनाचे संकेतस्थळ – https://mahatenders.gov.in

(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

ii) कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. १, विभाग, धाराशिव यांचे कार्यालयातील नोटीस बोर्ड.

जा.क्र. कृमबांविक्र.1/लेखा–2/ निविदा/709

कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.1

धाराशिव यांचे कार्यालय,

दिनांक:–17-03-2026

स्वाक्षरित/–

कार्यकारी अभियंता,

कृष्णा मराठवाडा बांधकाम

विभाग क्र.१ धाराशिव

जिमाका/एके/जाहि/१८८


## महत्त्वाची प्रमाणपत्रे हरवली आहेत

सुरेश सर्जेराव चेमटे मु.शिवाजीनगर,कोल्हेर रोड, गेवराई जि.बीड येथील राहाणारे असून त्यांची पुढील प्रमाणे महत्त्वाची कागदपत्रे हरवली आहेत.

सम्पूर्णानन्द संस्कृत विश्वविद्यालय, वाराणसी द्वारा प्रदान केलेले.

१. पूर्व मध्यमा परिक्षाचे प्रमाणपत्र (अनुक्रमांक ५२१६६, वर्ष–२०००, परिक्षार्थीचे नाव चेमटे सुरेश)

२. उत्तर मध्यमा परिक्षाचे प्रमाणपत्र (अनुक्रमांक ८५३६, वर्ष–२००२, परिक्षार्थीचे नाव चेमटे सुरेश) हे दोन्ही प्रमाणपत्र गावाकडून तुळजापूर मध्ये जवाहर नवोदय विद्यालयाकडे जात असताना दि. ०९–०३–२०२६ हरविले आहेत. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.

**संपर्क–सुरेश सर्जेराव चेमटे मो.९५९५९३०८८२**

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२–२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२–२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२–२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२–२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२–२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२–२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२–२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२–२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२–२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२–२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२–२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२–२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१–२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२–२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२–२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२–२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२–२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२–२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२–२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649